म. ग्रं. सं. ठाणें


विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन



ના ૩૨૬

[illegible]

ના ૨૪૪

# भ्रांतिकृत चमत्कार.

किंमत साहा आणे.

# SHAKESPEARE'S
# COMEDY OF ERRORS.

## भ्रांतिकृत चमत्कार.

हें पुस्तक
रसिकजनमनोरंजनार्थ
तयार केलें.

**आवृत्ति तिसरी**

मुंबईत
"गणपतकृष्णाजीच्या" छापखान्यांत छापिलें.

सन १८९२.

विविधज्ञानविस्तारपुस्तकालयांत विकत मिळेल.

किंमत सहा आणे.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

इंग्रजींत शेक्सपियरकृत "कॉमेडी ऑफ् एरर्स" ह्मणून एक नाटक आहे, त्याचें हें भाषांतर एथें नाटककार मंडळी-कडून प्रयोग करण्याकरितां केलें होतें. तो प्रयोग नाटक-कारांच्या परिश्रमानें चांगला झाला, आणि एकंदर नाटक लोकांस बरेंच आवडलें असें दिसलें.

हें नाटक मूळचें फार मौजेचें आहे. हें इंग्रजींत ज्यांनीं वाचलें असेल त्यांस ठाऊक असेलच. याचें संविधानक फार सोपें असल्यामुळें तें एथें सर्व सांगण्याची जरूरी दिसत नाहीं. दोघे बंधू स्वरूपानें अगदीं एकसारखे होते. तसेंच दोघांचे दोन चाकरही भाऊ भाऊ असून एकासारखे एक होते. हे बालदशेंतच एकमेकांपासून दूर झाले. पुढें ते तारुण्यांत आल्यावर त्यांतील एकजण आपल्या चाकरासुद्धां भावा-च्या शोधाकरितां निघाला. कालांतरानें तो, त्याचा भाऊ व चाकर हे ज्या शहरीं होते, तेथें आला. त्या ठिकाणीं त्यांची गांठ पडून ओळख पडण्यापूर्वीं, हीं दोन जोडपीं दि-सण्यांत एकसारखीं असल्यामुळें, हा तो कीं तो तो, या भ्रांतीनें एक दिवस जी कांहीं मौज झाली, ती या नाटकांत वर्णिली आहे.

या नाटकांत स्थलांचीं नांवें कोंकणपट्टींतील समुद्रकां-ठचे प्राचीन शहरांचीं घेतलीं आहेत, हें सुज्ञ वाचकांस कळेलच.

भाषांतर देशरिवाजास अनुसरून आणण्याकरितां कि-त्येक ठिकाणीं पात्रांचीं भाषणें मूळच्याहून कांहीं निराळ्या तऱ्हेचीं लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

अकोलें, आगष्ट १८७७.

---

## दुसऱ्या आवृत्तीची सूचना.

पहिली आवृत्ति इ० स० १८७८ मध्यें छापली; तीमध्यें नजरचुकीनें जीं अशुद्धें पडून गेलीं होतीं, तीं हींत नीट क-रून, कोठें कोठें फेरफार करणें इष्ट वाटलें तेथें ते केले आहेत.

# पात्रें.

राजा ............. सारंगपुरचा अधिपति.

धनपाल ........... शृंगारपुरचा व्यापारी.

हेमकांत शृंगारपुरकर }
हेमकांत सारंगपुरकर } धनपालाचे पुत्र.

धर्म्या शृंगारपुरकर } दोघे भाऊ, उभयतां
धर्म्या सारंगपुरकर } हेमकांतांचे सेवक.

ताराचंद ........... व्यापारी.

जगजीवन ......... सोनार.

तारामती........... हेमकांत सारंगपुरकराची बायको.

भानुमती........... तारामतीची मावसबहीण.

गजी ............. तारामतीची दासी.

इंदुमती ( गोंसावीण ) .. धनपालाची बायको.

वेश्या, रक्षक, द्वारपाल, तुरुंगावरचे अधिकारी, जमादार–इ०

---

स्थल–सारंगपुर शहर.

---

# भ्रांतिकृत चमत्कार.

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

**स्थल--राजवाडा.**

**पात्रें.**

राजा, धनपाल, रक्षक, व इतर सेवक.

**धनपाल**—राजा, आतां अंत नको पाहूं. एकदां शेवट कर. ह्मणजे या सर्व दुःखांतून मुक्त तरी होईन.

**राजा**—धनपाला, उगीच विनवणी नको आतां. तुझा पक्ष धरून या राज्यांतला कायदा मी मोडणार नाहीं. तुमच्या शृंगारपुरच्या दळव्यांनीं आमच्या सारंगपुरकर व्यापाऱ्यांवर कसा कडाखा उडविला आहे तो पाहिलासना? बिचारे व्यापाराकरितां तुमच्या बंदरीं जातात; पण कांहीं अपराध नसतां, नुसतें सारंगपुरकर इतकें नांव कळलें पुरे, कीं त्यांजकडून जबरदस्त दंड घ्यावा; दंड देण्याला सामर्थ्य नसलें तर त्यांचें डोकें उडवावें; अशा निर्दय कृत्यानें तुमच्या गांवीं आमची प्रजा प्राणास मुकते, आणि शृंगारपुरकर व्यापाऱ्यांवर मात्र आह्मीं दया करावी! अलीकडे हा द्वेष फारच वाढत गेल्यामुळें आह्मांस असा कायदा करावा लागला आहे कीं, आमच्या व्यापाऱ्यांनीं शत्रूच्या

बंदरीं जाऊं नये, आणि शत्रूच्या व्यापाऱ्यांनीं आमच्या बंदरीं येऊं नये. कोणी आलाच तर त्यानें एक हजार होन दंड द्यावा, नाहीं तर मरावें. शृंगारपुरकरांचाही असाच कायदा आहे असें कळतें. आतां या कायद्याप्रमाणें तुझी सर्व मालमत्ता पाहिली तर शंभर होनांचीही भर होणार नाहीं. यास्तव तुला आपलें शिर देणें भाग आहे.

**धनपाल**—राजा, तुझ्या बोलण्यावरून आतां मला समाधान इतकेंच होत आहे कीं, एकदां शिर देऊन टाकलें, ह्मणजे त्याबराबर, आजपर्यंत वाहिलेला जो हा दुःखाचा डोंगर तोही उतरेल.

**राजा**—धनपाला, तूं आपलें घरदार सोडून निघालास तरी कां? आणि या आमच्या बंदरीं आलास तरी कशाकरितां?

**धनपाल**—महाराज, मी आपल्या पोटांतलीं दुःखें काय सांगूं!–आणि सांगून तरी आतां उपयोग काय? तथापि प्राण आहे तोंपर्यंत जनांस हेंही विदित केलें पाहिजे कीं, हें आजचें मरण मीं दुष्ट कृत्यें केल्यामुळें प्राप्त झालें आहे असें नाहीं; तर पोटांतली कळ साहवेना ह्मणून बाहेर निघाल्यामुळें त्यास पात्र झालों आहें. राजा, माझा जन्म शृंगारपुरींच झाला. यथाकालीं विवाह झाला. दैवयोगानें स्त्री अतिगुणवान् मिळाली, आणि आह्मीं उभयतांनीं सुखांत दिवस घालविले. आमचा व्यापार चांगला चालत होता, तेणेंकरून द्रव्य पुष्कळ मिळत गेलें. एके दिवशीं सिंधुदेशीं माझा विश्वासू मुनीम होता, तो निवर्तल्याचें वर्तमान आलें; आणि तिकडे व्यापाराचा पसारा मोठा असल्यामुळें मला माझ्या प्रियेस सोडून जाणें भाग पडलें. मला जाऊन

चार महिने लोटले नाहींत, तोंच विरहदुःख न साहिल्यामुळें, ती बिचारी पूर्ण मास झाल्याचे कष्ट सोशीत असतांही मजकडे निघून आली. पुढें तेथेंच थोडक्या दिवसांनीं तिला दोन उत्तम पुत्र झाले. आणि राजा, काय चमत्कार सांगावा? ते अगदीं एका सारखे एक! दोघांची एक प्रतिमा! आणखी एक चमत्कार कीं, आह्मी ज्या बिऱ्हाडीं राहात होतों, तेथें त्याच घटकेस दुसरी एक स्त्री प्रसूत होऊन तिलाही असेच दोन एकासारखे एक मुलगे झाले. या दुसऱ्या दोन मुलांची आई फार गरीब असल्यावरून, तिला द्रव्य देऊन, तीं मुलें पुढें माझ्या पुत्रांच्या सेवेस उपयोगीं पडावीं ह्मणून त्यांस मीं विकत घेतलें. नंतर कांहीं दिवस तेथें आराम करून परत स्वदेशीं येण्यास आह्मी निघालों. दैवाची गति काय सांगावी! सुमारें अर्धी मजल आमचा प्रवास सुखानें झाला. मग एके दिवशीं संध्याकाळीं वारा किंचित् अधिक सुटला, आकाश ढगांनीं व्याप्त होत चाललें, रात्र भयंकर वाटूं लागली, आणि समुद्रांत जेव्हां मोठमोठाल्या लाटा हेलकावूं लागल्या, तेव्हां मोठ्या तुफानांत आमचें जहाज सांपडलें, याविषयीं संशय राहिला नाहीं. तथापि अशा स्थितींत आमचे दर्यावर्दी निराश झाले नाहींत. परंतु मध्यरात्रीच्या सुमारास तारूं अनावर झालें. मग काय विचारतां! एकच हाहाकार झाला! माझी स्त्री आपल्या दोन मुलांस पोटाशीं धरून एकसारखी आक्रोश करीत बसली. ती रडते हें पाहून मुलेंही रडूं लागलीं. मी मरणास भीत नव्हतों, परंतु त्या बापड्यांच्या तोंडांकडे पाहून त्यांस वांचविण्याकरितां तरी वांचावें असें मला वाटूं लागलें. हें होत होतें तोंच धाडकन् जहाज एका खडकावर आपटलें! मग काय

विचारावें! जहाजाची नाळच मोडली. पाणी आंत भरूं लागलें. जो तो आपापला प्राण वांचविण्याच्या उद्योगास लागला. दोन होड्या तारवांत होत्या त्या खालीं लोटून दर्यावर्द्यांनीं आपली वाट काढली. अशा समयीं कोण कोणाचा धनी, आणि कोण कोणाचा चाकर! अशांतही माझ्या स्त्रीनें आपला व बालकांचा बचाव करण्याचा उपाय पाहिला. जहजांत एक डोलकाठी नेहमीं जास्ती बाळगलेली असते, तशी ह्यांतही एक होती. ती तिच्या दृष्टीस पडली. तीस एके बाजूस झट्कन् तिनें आपलें धाकटें मूल नेऊन बांधिलें. मीं त्याचेच शेजारीं त्या दुसऱ्या दोन मुलांपैकीं एक नेऊन बांधलें; आणि डोलकाठीच्या दुसऱ्या शेवटास अशींच दुसरीं दोन्ही मुलें नेऊन बांधलीं. नंतर आह्मी उभयतां डोलकाठीच्या दोहों बाजूंस मुलांस जवळ धरून ईश्वरावर हवाला टाकून उभीं राहिलों. पण फार वेळ गेला नाहीं, तोंच जहाज पाण्यांत बुडून आह्मी सर्व डोलकाठीच्या आधारानें तरंगत चाललों. उजाडण्याच्या सुमारास वारा बंद झाला, आकाश स्वच्छ झालें, आणि रात्रीं जो अनर्थ झाला त्याचा दुसरा कांहीं पत्ताही राहिला नाहीं. सकाळीं दिसूं लागल्याबरोबर किनाऱ्याकडे पहातों, तों जमीन फार दूर, आणि आह्मी चौल बंदर टाकून दक्षिणेस चाललों आहों. इतक्यांत दोन जहाजें आमच्याकडे येतांना दृष्टीस पडलीं. एक श्रीवर्धनच्या बंदरांतून बाहेर पडत होतें, आणि दुसरें तर सुवर्णदुर्गकरांचे ओळखीचेंच होतें. परंतु काय नशीब आमचें! हातीं घेतलेलाही ग्रास मुखांत जाऊं नये काय! राजा, कशाला ती आतां पुढली कथा पाहिजे!

## अंक दुसरा.

### प्रवेश पहिला.

### स्थळ--हेमकांत सारंगपुरकर यांच्या घरासमोरचा रस्ता.

( तारामती आणि भानुमती येतात. )

**तारामती**—अद्यापि घरीं येणें होत नाहीं. मेल्या धर्म्याला केव्हांचें पाठविलें ! ह्मटलें, धांवत जा आणि आपल्या यजमानानां घेऊन ये, तों तोही तिकडेच ! ताई भानुमती, दोन तर वाजले असावेत वाटतें.

**भानुमती**—कदाचित् एखाद्या व्यापाऱ्याची गांठ पडली असेल, किंवा पेठेंतून कोणीं जेवायास बोलावून नेलें असेल. कोणीं सांगावें बाई ? चल आपण आतां जाऊन जेवूं. उगीच त्यांच्यावर कां त्रासावें ? पुरुषांचें सगळें वेगळें असतें. त्यांस वेळ पडेल तसें वागावें लागतें. त्यांना वाटलें-वेळ आहे, आतां जावें, तर ते येतात, नाहीं तर राहातात. तेव्हां बाईगे, आपण आपलें स्वस्थ रहावें हें बरें.

**तारा०**—कां गे ताई, आमच्यापेक्षां त्यांनाच कशाला अधिक मोकळीक पाहिजे ही अशी ?

**भानु०**—याचें कारण असें आहे बघ, त्यांचीं कामें घरांतील नसतात; त्यांस बाहेर चौघांत वागावें लागतें.

**तारा०**—पण पहा, मी तशी एखादे वेळीं वागलें तर तिकडे मात्र तसें आवडत नाहीं. लागलीच मर्जी बिघडते.

**भानु०**—बाईगे, आपल्याला पुरुषांच्या तंत्रानें वागायाला पाहिजे. हेंच आपण आपलें भूषण समजावें.

**तारा०**—कोणी अशा वागणाऱ्या असतील त्या वागतील! एथें काय गाय बकरी आहे वाटतें, ह्मणून ती अगदीं दाव्यानें बांधून घेऊन राहील! मर्यादा मर्यादा ह्मणजे कोठवर!

**भानु०**—हें काय ह्मणतेस बरें? बाई, हेंकडपणा करून अमर्यादा केल्यानें कोणाला तरी सुख होणार आहे काय? पहा, आणि विचार कर, ह्मणजे तुला आढळेल कीं, मर्यादा नाहीं अशी एक तरी वस्तु आहे का! तूं कोणत्याही माण्यांत पहा. पुरुषजातीचा पगडा बायकांवर असतोच. ईश्वरानें त्यांच्या अंगीं सामर्थ्य अधिक कां ठेविलें आहे? त्यांची धारणाशक्ति, आणि त्यांचे विचार हे आपल्यापेक्षां अधिक होत नाहींत का? ते जीं कामें करितात तीं आपल्याला करावयाला सांगितलीं तर होतील का?

**तारा०**—वाः! आमच्या भानुमतीताईनेंआज अगदीं दाखला देऊन गोष्ट सांगितली हो! याच्यावर कोणी कांहीं बोलूंच नये! बायकांचें मेलें दोहींकडून पाप! त्यांना घरांत बसवून कडी कुलपें लावून ठेवायाचें, आणि ह्मणायाचें, पुरुषांप्रमाणें त्यांच्यानीं बाहेरचीं कामें व्हावयाचीं नाहींत! बायकांनीं कोणाजवळ बोलायाचें झालें, तर आधीं चारी दिशा डोकावून पहाव्या, आणि मग कोठें एखादा शब्द तोंडांतून काढावा. पुरुषांना अशा रीतीनें वागूं द्या आणि मग त्यांची जास्ती अक्कल आणि जास्ती सामर्थ्य कोठें रहातें तें पाहूं! ताई, तुला ठाऊक नाहीं; माझा धाकटा भाऊ वीरसेन सात वर्षांचा झाला नव्हता, तोंच त्याच्या हातीं धनुष्य; त्यानें पट्टा खेळायाला शिकावें, रोज घोड्या-

वर बसून धांवावें, बाबाबरोबर कधीं महालांत व राजाचे सभेस जावें, त्याला पेठेंत न्यावें, जवाहीर दाखवावें. आणि ह्मटलें ह्मणजे माझ्यापेक्षां देखील तो नाजुक हो! इकडे आमच्या कपाळीं मेलें कोठें भातुकलीला लाह्यांचें पीठ घ्यावें, लटुपटूचा स्वयंपाक करावा आणि भावलांभावलींचीं लग्नें लावावीं. झालें, अशांत सगळा वेळ जायचा.

**भानु०**—बये तारामती, असें नकोगे तूं ह्मणूं. तुला वाटतें, बायकांना बाहेरचीं कामें करूं देत नाहींत ह्मणून तीं त्यांच्यानें होत नाहींत? बरें, तर तूं असें पहा, आपल्याला एक घरांत बसून नाजुकपणा येतो, आणि चाकर माणसें असतात ह्मणून कामें करण्याची संवय नसते. पण, गरीब लोक व शेतकरी लोक यांच्या तर बायका पुरुषांबरोबरच लहानपणापासून बाहेरचीं कामें करितातना? मग त्यांना पुरुषांप्रमाणें सामर्थ्य कां नाहीं? पुरुषांवांचून बायकांचें चालणार नाहीं बाई. पुरुषांचे धर्म पुरुषांना आणि बायकांचे बायकांना. पुरुषांनीं आपल्या सामर्थ्यानें बायकांस सांभाळावें, आणि बायकांनीं आपल्या गुणांनीं पुरुषांना सुख द्यावें, असाच ईश्वराचा संकेत आहे. ह्मणून आपला हेका धरून एथें काय उपयोग? यासाठीं तुला सांगतें, आपण आपली मर्जी पुरुषांच्याच आधीन ठेविली पाहिजे.

**तारा०**—ताई, तुला ब्रह्मज्ञान सांगायाला बरें सुचतें, पण याच गुलामगिरीच्या धास्तीनें तूं अजून लग्न केलें नाहींस!

**भानु०**—ह्मणून नाहींगे बाई. पण एकदां लग्न झालें ह्मणजे दुसऱ्या कित्येक विवंचना मागें लागतात. मला

मागणीं नाहीं का पुष्कळ आलीं? पण मी आईजवळून एवढें अगदीं मागून घेतलें आहे कीं, इतक्यांत कांहीं कबूल करूं नये.

**तारा०**—पण एकदां लग्न झालें ह्मणजे असाच नवऱ्याचा जाच सोसावा लागेल!

**भानु०**—तशी आवडीनिवडीची वेळ यायाच्या आधीं दुसऱ्याची मर्जी संभाळून कसें रहावें हेंच मी शिकून घेईन.

**तारा०**—बरें, समज तुझें लग्न झालें, आणि नवरा इकडे तिकडे जाऊं लागला तर मग?

**भानु०**—तर मग काय? बसेन वाट पहात. दुसरें काय करायाचें आहे?

**तारा०**—खरेंगे बाई. अनुभव नाहीं तोंवरच ह्या गोष्टी! आपला जीव तळमळतो तो दुसऱ्याला काय कळे? कधीं कळ साहत नाहीं ह्मणून बोलायाला गेलें तर कोरडें ब्रह्मज्ञान बरीक पुष्कळ! पण प्रसंग आल्यावर माझ्या इतक्या तरी दम धरणाऱ्या मिळाव्यात! ताई, तुला अजून प्रसंग नाहीं, आणि असल्या एखाद्या स्वच्छंदी पुरुषाशीं गांठ न पडावी; पण दैवानें पडली, तर मग दुसऱ्याला सांगायाचें हें तुझें ब्रह्मज्ञान कोठें राहील तें मीच पाहीन!

**भानु०**—बरें, कधीं तरी माझें लग्न होईलच. सारा जन्म असा घालवायाचा नाहीं, आणि अनुभवाअंतीं—

(इतक्यांत समोरून धर्म्या येतो आहे असें पाहून बहिणीला ह्मणते—) बाई, हा बघ आला एकदांचा धर्म्या! आतां भावोजी लौकर येतील हो!

(धर्म्या सारंगपुरकर येतो.)

**तारा०**—कायरे धर्म्या, गांठ पडली होती का ?

**धर्म्या सार०**—गांठ ह्मणजे, चांगलीच गांठ पडली होती. कांहीं बाकी ठेविली नाहीं.

**तारा०**—अरे पण बोलले काय ? आज काय मनांत आणलें आहे ?

**ध० सा०**—मनांत काय आणलें आहे तें माझ्या कानसुलावर सांगितलें आहे. पहा. आजपर्यंत असा हात कधीं माहीत झाला नव्हता बाबा !

**तारा०**—ह्मणजे काय ? तुला कांहीं कळलें नाहीं कीं काय ? बेत काय आहे तो तुला समजला नाहीं वाटतें ?

**ध० सा०**—समजला, बाईसाहेब, पुरता समजला ! आतां आणखी समजायाला नको ! आज चांगली खाशी खात्री झाली ! पण समजलों ह्मणावें, तर समजत पण नाहीं ! याचा काय अर्थ असेल तो असो !

**तारा०**—आतां तें सगळें राहूं दे. मला एकच सांग, घरीं येणें होत आहे का नाहीं. घरची काळजी तर फारच असेल !

**ध० सा०**—बाईसाहेब, काय सांगावें ? मला वाटतें खचित त्यांनीं भाड खाल्ली असावी !

**तारा०**—कायरे मेल्या, काय बोललास ?

**ध० सा०**—नाहीं, ह्मटलें भांग खाल्ली असावी. कां ह्मणाल तर बघा,-मी ह्मटलें घरीं जेवावयाला चला; तर आपण ह्मणतात, माझी हजार मोहरांची गठडी कोठें आहे ? मी ह्मटलें, अहो भोजनाची वेळ झाली; तर ते ह्मणतात, माझ्या मोहरा काय झाल्या ? मी ह्मटलें, स्वयंपाक निवतो; ते ह्मणतात, मोहरा कोठें आहेत ? घरीं यावयाचें कीं नाहीं,

असें मी पुसलें, तर आपलें माझ्या मोहरा!! याप्रमाणें कांहीं ह्मटलें तरी माझ्या मोहरा! लुच्चा, लबाडा, माझ्या मोहरा कोणाला दिल्यास?—असेंच ह्मणतात! मी ह्मटलें, आमच्या यजमानीण बाई वाट पहातात; तर ते ह्मणतात, जाऊं दे ती तुझी यजमानीण मसणांत! कोठली यजमानीण घेऊन बसला आहेस! असें एखसारखे बडबडत होते.

**भानु०**—कोण?

**ध० सा०**—आमचे यजमान महाराज, आणखी दुसरे कोण? ह्मणत कीं मी घर जाणत नाहीं, बायको जाणत नाहीं, आणि यजमानीण कोण तीही जाणत नाहीं, तेव्हां मी तुमचा निरोप तोंडानें नेला आणि पाठीवरून परत आणला! हा पहा कसा मार खावा लागला तो! (पाठ दाखवितो.)

**तारा०**—माझ्या बाबा, पुन्हा जा कसा, आणि त्यांना इकडे एकदां घेऊन ये!

**ध० सा०**—पुन्हा जाऊं!-आणि आपली पाठ आणखी रंगवून घेऊं! बाई, मला दुसरी पाहिजे ती कामगिरी सांगा, पण ही नको!

**तारा०**—चल जा मेल्या लौकर! नाहीं तर मुसकटांत देईन बघ!

**ध० सा०**—हें चांगलें! इकडून यजमानीण बाई मुसकट रंगविणार आणि तिकडून यजमान पाठ रंगविणार! ह्मणजे आमची आज दोघांच्या हातून रंगपंचमीच होणार!

**तारा०**—मेला बडबडच करीत राहिला उभा!

**ध०सा०**—जातों बाई! इकडून बुक्यांचा मार आणि तिकडून लाथांचा मार! (निघून जातो.)

भा०—हें असें कायगे ताई! इतकें काय असें लाल होऊन जावें! आणि असे काय ओंठ काढावे हे!

तारा०—तिकडे मात्र हव्या तशा मौजा माराव्या, आणि आह्मी इकडे, देवा एक तरी गोड शब्द मिळेल काय, ह्मणून तळमळत बसावें! काय मी आजच ह्मातारी झालें? का माझ्या गालांना अगदीं सुरकुत्या पडल्या? मेली काळजी, काळजीनें झालें खरी अशी. पण काळजी कोणामुळें? माझें बोलणें देखील आवडेनासें झालें कायगे? जर तें गोड लागत नसलें, तर त्याचा दोष कोणाकडे? सूर्यच जर प्रकाशला नाहीं तर कमळें तरी कशीं विकास पावतील? बाहेर कोठें दुसऱ्या थाटमाट केलेल्या दृष्टीस पडत असतील, आणि मग मन तिकडे घोंटाळत असेल. आमचें काय मेलें, सजणेंनटणें पुरुषांच्या हातीं. मिळेल तें नेसायचें, आणि देतील तें अंगावर घालायचें. त्यांतूनही मी हेंच घालीन आणि तेंच नेसेन, असा लोकी बायकांसारखा मी हट्ट कोठें घेऊन बसतें आहें? तूं देखील ताई पाहत नाहींस का, ही कशी माझी दशा झाली आहे ती? पण कांहीं तरी कोणाला दया येते का? आपण आपल्याशीं मुळमुळ रडावें, आणि कधीं रडतांना पाहिलें ह्मणजे तितकेंच निमित्त ठेवावें आणि कपाळाला आंठ्या घालाव्या, असा प्रकार आतांशा चालला आहे!

भा०—असें काय हें, व्यर्थ आपणच आपल्या जिवाला त्रास करून घ्यावा! बये, हा असला स्वभाव टाकून दे परता.

तारा०—कोणी एखादी वेडी बावळी असती तर मात्र तिला हें न कळतें. पण मी आज बरेच दिवस पाहत आहें,

दृष्टि चंचळ झालेली आहे. मन कोठें तरी बाहेर असतें. नाहीं तर घरीं यायाच्या वेळेवर न येते काय ? ताई, तुला ठाऊक आहेना मलाच कंठा करावयाला दिला आहे ह्मणून सांगणें झालें होतें तें ! झाला असेल तो कंठा, आणि पडला असेल कोणाच्या गळ्यांत कधींच ! एथें काय थोडीच कोणाची मर्जी मिळवायाची आहे ! आह्मी मेल्या अशाच रडून रडून मरणार.

भानु०—ताई, काय हा वेडेपणा ? आज कांहीं बोलावयाचा इलाज नाहीं बाई. चल ऊठ, घरांत जाऊं. ऐथें बसून तरी तुझें असेंच चालणार.

( निघून जातात. )

---

प्रवेश दुसरा.

## स्थल—चिमणबागेच्या समोरचा रस्ता.

( हेमकांत शृंगारपुरकर येतो. )

हेम० शृं०—धर्म्याजवळ दिलेल्या मोहोरा तर विहारांत सुरक्षित ठेविलेल्या सांपडल्या. गुलाम सावध खरा ! जिकडे तिकडे बंदोबस्त करून, मला शोधून घेऊन जाण्याकरितां कोठें फिरतो आहे. पण हें कसें ? बिऱ्हाडांतील लोकांच्या ह्मणण्यावरून, आणि आपणही आपल्या ठिकाणीं हिशेब पाहिला तरी, प्रथम जेव्हां धर्म्याला पेठेंतून घरीं पाठविला, तेव्हांपासून त्याची माझी गांठच पडूं नये. आला, पण तोच आला !

(इतक्यांत धर्म्या शृंगारपुरकर येतो.)

कसें काय ? आतां चांगलें शुद्धीवर आहांना ? आणखी थट्टा करावयाची आहे काय ? गुलामा, तुला विहारांतील

बिऱ्हाड माहित नव्हतें, तुला मोहरा दिलेल्या माहित नव्हत्या नाहींं? तुझ्या धनिणीनें मला जेवावयाला बोलावलें, आणि माझें घर चिमणबागेंत! तुला वेड तर लागलें नव्हतेंना? ती अशी एकसारखी बडबड मघा काय लावली होतीस?

**धर्म्या शृं०**—कसली बडबड महाराज? मी एक शब्द तरी तुमच्याजवळ बोललों का?

**हेम० शृं०**—अर्धी घटका पण झाली नसेल. ह्या येथेंच पेंठेमधें.

**धर्म्या शृं०**—मघाशीं मला तुह्मीं मोहरांची गठडी दिली आणि सांगितलें कीं, विहारांत आपल्या मंदिरांत ती घेऊन जा. तेव्हांपासून मी तुह्मांला भेटलों कधीं आणि बोललों कधीं?

**हेम० शृं०**—हा लबाडा, मला मघाशीं मोहरांचा पत्ता देखील लागूं देत नव्हतास. कोठली एक यजमानीण आणली होतीस, आणि जेवण घेऊन बसला होतास. मग मला मोठा संताप आला. आणि त्याची तुला आतां चांगली आठवण राहिली असेल!

**धर्म्या शृं०**—वाः! महाराज, आज आपली तब्बेत मोठी खूश दिसते! इतका रस आज कां पाघळतो?

**हेम० शृं०**—कां! पुन्हा नाक वर करून बोलावयाला लागलास का! मघाचें पुरें नाहीं झालें वाटतें! मी थट्टा करतों, नाहीं काय? माझी थट्टा दाखवूं काय आणखी एकदा, अं! ही बघ थट्टा! हा बघ रस पाघळतो! (त्याला मारतो.)

**धर्म्या शृं०**—अरे बापरे! हें कायहो! मी आतां थट्टा करणार नाहीं! महाराज, हें काय? याला नांव निमित्त तरी?

**हेम० शृं०**—मी आपला तुजजवळ गोडीगुलाबीनें

बोलतों आणि मस्करीला एखादे वेळीं कान देतों, ह्मणून तूं का फाजीलपणा दाखवितोस? तुझ्या टिवल्याबावल्यांला वेळ अवेळ मुळींच नाहीं. अरे, कमळें प्रफुल्लित असलीं तरच भ्रमर गुंजारव करूं लागतात. तींच जर मुकुलित झालीं तर तेही कोठें कोनाकोपऱ्यांत जाऊन बसतात. यास्तव आपण दुसऱ्याची आधीं मुखचर्या पहावी आणि त्याप्रमाणें मग वागावें. आतां पुढें, पहा बरें, पुन्हा असें भलतें सलतें केलेंस तर मात्र मुसकट फुटेल.

**धर्म्या शृं०**—अशीं जर उगीचच्या उगीच मुसकटें फुटूं लागलीं तर मला दहा पांच तरी मुसकटें विकत घेऊन ठेविलीं पाहिजेत, आणि एक एक बगलेंत बाळगलें पाहिजे! पण महाराज, हा आज मला मार कां? याला कांहीं कारण आहे काय?

**हेम० शृं०**—तुला आजून कांहीं कळत नाहीं वाटतें?

**ध० शृं०**—मारलें इतकें मात्र कळतें. तें आतां पुन्हा कळायाला नको.

**हेम० शृं०**—मग तुला आतां कारण पाहिजे वाटतें? वेड्या, भलत्याच वेळीं थट्टा चालविलीस हें एक, आणि नको ह्मणत असतां जास्तीच केलीस, हें दुसरें.

**ध० शृं०**—ह्मणजे? दोन्ही कांहीं नाहींत! कांहीं न करितां बक्षीस, असें कधीं आजपर्यंत कानांनीं ऐकलें नव्हतें. बरें बाबा, केलेत ते उपकारच केलेत!

**हेम० शृं०**—उपकार ह्मणजे?

**ध० शृं०**—हो, चाकरीशिवाय भाकरी मिळते, तेव्हां उपकारच ह्मणावयाचे.

**हेम० शृं०**—बरें ये, धर्म्या, चल आतां, पुढें तुजज-

वळून एखादे वेळीं भाकरीशिवाय चाकरी घेईन ह्मणजे झालेंना? आतां सांग, जेवावयाची वेळ झाली काय?

ध० शृं०—आतांशी तर भाजी घेऊन चाललों आहें.

हे० शृं०—कसली भाजी नेतोस पाहूं.

ध० शृं०—हा भोंपळा.

हे० शृं०—कां रे, दुसरी कांहीं भाजी नव्हती?

ध० शृं०—कारलीं होतीं, गोंवारीच्या शेंगा होत्या. पण बरें केलें, त्या आणल्या नाहींत. आधींच पित्त भडकलेलें आहे, आणि तें आणखी जास्ती व्हावयाला त्या कशाला पाहिजेत?

हे० शृं०—तुला अजून देखील थट्टा करावीशी वाटतेना? कोणतीही गोष्ट करणें झालें तर ती वेळ पाहून करावी.

ध० शृं०—आतां सगळ्या गोष्टी वेळ पाहूनच होत असतील! भूक लागली तरी वेळ पाहूनच जेवावें, ताहान लागली तरी वेळ पाहूनच पाणी प्यावें, पोट दुखलें तरी वेळ पाहूनच रडावें, आणि औषध मागणें झालें तरी वेळ पाहूनच मागावें! वाः! हा वेळ पाहून सर्व गोष्टी करावयाचा उपदेश अगदीं सगळ्यांनां सगळ्या ठिकाणीं घ्यावयाजोगा आहे. राजानें देखील मला वाटतें अशीच द्वाही दिलेली असेल, कीं सगळ्यांनां विधि करणें तरी तो वेळ पाहूनच करावा!

हे० शृं०—आज कांहीं तुझ्या पुढें बोलावयाचा इलाज नाहीं. थांब पण, तें पहा तिकडे कोणी बोलावतें आहे. काय आहे तें चल बघूं.

( तारामती व भानुमती येतात. )

**तारा०**—आज हें मांडलें आहे काय आणि चर्या अशी कावरी बावरी कां ही? कपाळाला आंठ्या कां पडल्या आहेत? हौस पुरवायाला कोण मिळाली होती? तिला सोडून यायाला मोठें जड वाटलें असेल! मी जशी काय अगदीं कोणीच नव्हे मेली, मागलें तें आतां सगळेंच विसरलें. नाहीं तर माझ्यावांचून एक घटकाभरही चैन पडत नव्हतें. घटकाभर कोठें दृष्टीआड झालें, तर खालचा जीव वर आणि वरचा जीव खालीं होत असे. मी जराशी बोललें नाहीं, तर खुशामती होत होत्या. वाढायाला नसलें तर जेवण गोड लागत नव्हतें. आणि आतां तें सगळेंच फिरलें! मला अशानें ओळखायाला देखील पंचाईत पडूं लागली! कां तर, मागलें कांहींच मेलें राहिलें नाहीं, तेव्हां ओळखावें कशावरून? उगीच आपल्या ब्रह्मदेवानें गांठी मारल्या आहेत ह्मणून ह्मणायाचें, अमकीचें अमुक आणि तमक्यांची तमूक! पण ह्या गांठी आहेत जन्माच्या! जाळूं गेल्यानें जळायाच्या नाहींत आणि तोडूं गेल्यानें तुटायाच्या नाहींत! पण ध्यानांत घेतो कोण! ठीकच आहे. पुरुषांना सर्वच गोष्टींची मोकळीक आहे. बायकांनीं मेलें जरा इकडे तिकडे पाहिलें, कीं झालें,—मग सर्व माणसें तिला बोंचून खातात. तिचें तर कपाळ फुटलेंच,—पण ती दोन्ही कुळ्या बुडविते, आणि नवऱ्याला तर तोंड बाहेर काढूं देत नाहीं. तिची चर्चा सर्व गांवभर होत असते. आणि जेव्हां इकडेही नाहीं,—तिकडेही नाहीं, आंत नाहीं,—बाहेर नाहीं, तेव्हां तिला दे माय धरणी ठाय, असें होत असतें. पुरुषांनीं आपलें कांहीं केलें तरी तो पुरुषार्थच. सारांश, हें जग पुरुषांचें आहे, एवढी गोष्ट खरी. आह्मी

आपल्या ठिकाणीं मात्र उगीच तडफडावें. ऐकतो कोण?

**हेम० शृं०**—बाई, तुह्मी हें मलाच लावून बोलतां काय? माझी तुमची तर ओळखही नाहीं, आणि मला या तुमच्या सारंगपुरांत येऊन अजून चार घटकाही झाल्या नाहींत! मीं हें तुमचें सगळें बोलणें ऐकलें, पण यांतला एक शब्द देखील मला समजला नाहीं. तेव्हां हें काय असेल तें असो!

**भानु०**—हेमकांत भावोजी, हें असें बोलणें तुह्मांला शोभतें काहो? अजूनपर्यंत ताईला असें कधीं नव्हते बोललेत! तिनें बापडीनें दोनदां धम्म्याच्या हातीं घरीं यायाला निरोप पाठविला.

**हेम० शृं०**—धम्म्याच्या हातीं?

**धम्म्या शृं०**—माझ्याच हातीं?

**तारा०**—हो हो तुझ्या! आणि मेल्या तूंच नाहीं का मला येऊन सांगितलेंस,-मला तिकडून मार बसला, आणि घरही ठाऊक नाहीं आणि बायकोही ठाऊक नाहीं ह्मणून बोलणें झालें तें?

**हेम० शृं०**—काय रे, तुझें या बयांशीं भाषण झालें होतें एकूण? ही काय तुमची मसलत आहे?

**धम्म्या शृं०**—मी तर महाराज यांना साऱ्या जन्मांत कधीं पाहिलें नव्हतें. आतां पहातों आहें इतकेंच.

**हेम० शृं०**—गुलामा, लबाड बोलतोस काय? हेंच त्यांचे निरोपाचे शब्द तूं मघांशीं पेंठेंत येऊन मला सांगितले होतेस!

**धम्म्या शृं०**—महाराज, मी कधीं त्यांजवळ एक शब्दही बोललों नाहीं.

**हेम० शृं०**—तर मग ह्यांना आपलीं नांवें देखील कशीं कळलीं रे ? ह्या काय अंतःसाक्षी आहेत ?

**तारा०**—ही आतां आमची फेड होती आहे वाटते ? कोठें मेलें वाईट वाटलें ह्मणून दोन शब्द जास्ती बोलायाला गेलें. वाः ! चाकर पण भला रे साथी मिळाला आहेस ! माझी जळली चूक झाली असेल, पण आतां कां दुःखावर डाग द्यावा ? बायका कितीही बोलल्या आणि रागावल्या, तरी ह्मणतात नाहीं, सरड्याची धांव कुंपणापर्यंत, अखेर नांक घांशीत यावें लागतें आह्मांलाच. कांहीं मनांत आलें तरी दुसरें कोणी बोलायाला का रुसायाला आहे काय ? चला घरामधें, मी पाय धुवायाला पाणी देतें. ही पहा बरें आज कशी तुमची अवस्था झाली आहे ती !

**हेम० शृं०**—( आपल्याशीं ) बोलते तर ही मलाच ! काय, स्वप्नांत तर हिच्याशीं माझें लग्न लागलेलें नाहींना ? का मी झोंपेंत आहें ? का मला कान डोळे तरी आहेत कीं नाहींत ? कदाचित् भ्रम असला तर तो तरी पक्का कळला पाहिजे ! असो, आतां पुढें आलें आहे तें टाकून देऊं नये.

**भानु०**—धम्यां, घरांत जा, आणि वाढायाची तयारी करा ह्मणून सांग.

**धम्यां शृंगार०**—राम राम राम राम राम ! आपल्या कानांत तुळशीपत्रें. जाखाई जोखाई, जखीण लावशी छूः ! राम राम राम ! काय असेल तें असो. आपण कोणाशीं बोलतों त्यांचीं नांवें देखील नकोत. पण त्यांनीं सांगितलें तसें केलें पाहिजे. नाहीं तर ह्या पोटांतील काळीज कापतील, किंवा ठेंचून चटणी करतील, नाहीं तर भाजून चुना करतील !

**भानु०**—कारे मेल्या, आपल्याशींच बडबड कसली करीत बसला आहेस ? धर्म्या, अरे ए गाढवा !

**धर्म्या शृं०**—महाराज, मी एथेंच आहें काय हो ?

**हेम०शृं०**—तूं आहेस एथें, पण तुझी अक्कल मात्र एथें नाहीं. जिकडे माझी तिकडेच तुझी !

**धर्म्या शृं०**—पण मी अजून माणसांतच आहें ना ?

**हेम० शृं०**—शरीरानें दिसतोस खरा.

**धर्म्या शृं०**—मला वाटतें, मी माकड बनलों आहें.

**हेम० शृं०**—कदाचित् बनला असशील, तर गाढव बनला असशील !

**धर्म्या शृं०**—हें मात्र खरें. पहा, ह्या कशा गाढवावर बसून त्यांचे लांब लांब कान हातीं धरून मोठ्या मौजेनें त्यांना नाचवीत चालल्या आहेत !

**तारा०**—पुरे पुरे आतां ! मी भरून पावलें हो ! आतां डोळ्यांत बोटें घालून रडूं आणून दाखवायाचें मात्र राहिलें आहे ! तुह्मी आपले धनी चाकर एक झालां आणि माझी मात्र शोभा करीत आहां ! या आतां एकदाचे जेवायाला. धर्म्या, दार लावून घे. आतां पाटावर बसणें झालें ह्मणजे मी वाढावयास घेतें. धर्म्या, तेथें दाराजवळच बैस, आणि बाहेरून कोणी हाक मारली तर जेवण होत आहे ह्मणून सांग. कोणाला आंत येऊं देऊं नको, समजलास ? ताई, चल गे आतां. धर्म्या, नीट संभाळ.

**हेम० शृं०**—( मनांत ) मी आज आहें कोठें ? स्वर्गांत कीं पाताळांत ? निजलों आहें कीं जागा आहें ? आहे काय आज ? ह्यांना माझी ओळख आहे आणि मला माझी ओळख नाहीं ? काय चमत्कार हा ! आतां ह्या

सांगतील तसेंच बोलावें, आणि आपल्याला दिसत नाहीं तर त्यांचाच हात धरून चालावें.

**ध० शृ०**—महाराज, मी एथेंच दार राखीत बसूंना ?

**तारा०**—हो हो ! एकदा सांगितलेंना ? खबरदार, कोणाला आंत येऊं देऊं नको. नाहीं तर टाळकेंच फुटेल.

**भानु०**—भावोजी, चला. अजून देखील उशीर नाहीं का झाला ?

( सर्व जातात. )

## अंक दुसरा समाप्त.

## अंक तिसरा.

### प्रवेश पहिला.

### स्थल—चिमणबाग.

[ हेमकांत सारंगपुरकर, धर्म्या सारंगपुरकर, ताराचंद, आणि जगजीवन येतात. ]

**हेम० सारंग०**—जगजीवनजी, आज आमची जरा बाजू राखा बरें. नाहीं तर घरांत गेलों ह्मणजे आमच्या डोक्यावर केंस रहाणार नाहींत. घरीं यायाला मला कधीं उशीर झाला ह्मणजे तिकडचें गाणें ठीक नसतें. मी तुमच्या दुकानीं तिचा कंठा लौकर व्हावयाकरितां बसलों होतों ह्मणून सांगा, व आतां उजाळा मात्र द्यावयाचा राहिला आहे असेंही ह्मणा. पण हा पाहिला, गुलाम बरोबर आहे हा? हा नाहीं तर लागलीच मान खालीं घालायला लावील! लबाड मला ह्मणतो काय—कीं मी त्याला बाजारांत भेटलों आणि त्याला मारलें, आणि हजार मोहराच घेतल्यास ह्मणून बोललों! काय, बेट्या, भांगबिंग तर प्याला नव्हतासना?

**धर्म्या सारंग०**—महाराज, आतां कांहीं ह्मणा. जें काय झालें तें एक तुह्मांला ठाऊक कीं एक मला ठाऊक. साक्षी काय ते दोनच,—तुमचा हात आणि माझी पाठ!

**हेम० सा०**—तूं काय गाढव तर नाहींसना?

**धर्म्या सा०**—मला पण असेंच वाटतें. पहा, नाहीं तर उगीचका इतकें सोसून घेतलें असतें? पण बघा!—गाढवाला लाथा मारल्या तर तें लागलीच ढुंगण फिरवून लाथा मारूं लागतें, आणि मग गाढवाजवळ कोणी उभें रहात नाहीं!

**हेम० सा०**—ताराचंदजी, आज मीं तुह्मांला फार श्रम दिले, आणि उशीरही झाला. असो, आतां घरांत गेलों ह्मणजे कांहीं उशीर नाहीं. पण जें असेल तें गोड करून घ्या, इतकेंच मागणें आहे.

**ताराचंद**—जेवायालाच चांगलें मिळालें ह्मणजे चांगलें, असें कांहीं नाहीं. सर्व कांहीं अगत्यावर आहे.

**हेम० सा०**—आह्मीं पानावर नुसती नाचण्याची भाकरी ठेवली आणि अगत्याच्या पुष्कळ मोठमोठाल्या गोष्टी सांगितल्या, तर उपयोग काय ?

**ताराचंद**—द्रव्य असलें ह्मणजे कोणीही मिष्टान्न करील.

**हेम० सा०**—कोरडें अगत्य दाखवायाला तर कांहींच खर्च नाहीं. तोंड हालविलें ह्मणजे झालें.

**ताराचंद**—तरी अगत्य पुष्कळ पाहिजे. मग खायापियाला थोडकें असलें तरी चिंता नाहीं.

**हेम० सा०**—कोणी कृपण असेल आणि ज्याला खर्चायाला फार नको असेल त्याला हें बोलणें शोभेल ! असो. आमच्या एथील बेत साधाच असला तरी गोड करून घ्या इतकेंच सांगायाचें. मेजवान्या तुह्मांला मोठमोठाल्या होतील, पण असे मनापासून आस्थेनें बोलावणारे विरळाच मिळतील. पण थांबाहो. दरवाजाला आंतून कडी आहे ! हो रे पुढें, दार उघडा ह्मणून सांग.

**धर्म्या सार०**—ए संपे ! निरगुडे ! धनजे ! सुकडे ! झपे !

**धर्म्या शृंगा०**—( आंतून ) गलेलट्ट, तेलंग भट्ट, कढी आंबट, कपाळ आपट ! हात् तुमचीं तोंडें भाजलीं मेल्यांनो ! सगळ्या गांवचीं खेटें नटें जमा झालीं आहेत गुलामाचीं !

**धर्म्या सारं०**—कोण पिसाट बसलें आहे दाराजवळ? बाहेर यजमान उभे आहेतना?

**धर्म्या शृंगा०**—( आंतून ) त्यांना आल्या वाटेनें माघारीं जा ह्मणावें. उगाच कां तळतळत उभे रहातात?

**हेम० सारं०**—कोणरे हा आंत बोलतो आहे? चल उघड लौकर दार!

**धर्म्या शृंगा०**—( आंतून ) होय हो, यजमानजी! कशाला दार उघडायाचें हें आपण आह्मांला सांगा, आणि कधीं दार उघडायाचें हें मग आह्मी आपल्याला सांगूं.

**हेम० सारं०**—कशाला ह्मणजे रे? जेवायाला. मी कांहीं अजून जेवलों नाहीं.

**धर्म्या शृंगा०**—( आंतून ) आज नाहीं येथें; दुसरीकडे सोय पहा, आणखी एखादे वेळीं इकडे या.

**हेम० सारं०**—तूं कोणरे आहेस, मलाच माझ्या घरांत येऊं देत नाहींस?

**धर्म्या शृंगा०**—( आंतून ) मी कोणीही असो. पण सध्यां एथें दार राखायाला बसलों आहें; माझें नांव धर्म्या.

**धर्म्या सा०**—हा लुच्चा माणसा! माझी जागा घेतलीस, आणि नांव पण तेंच घेतलेंस? अजून तुला सुख ठाऊक नाहीं! धर्म्या व्हायची हौस होती तर मघांशींच कां झाला नाहींस? ह्मणजे समजलें असतें-कीं एक वेळ गाढव होणें बरें, पण धर्म्या होणें बरें नाहीं.

**गजी**—( आंतून ) हें काय? मांडलें आहे काय तिकडे? धर्माजी, कोण बाहेर दाराला धक्का देतें आहे तें?

**धर्म्या सारं०**—गजे, आमच्या यजमानांना आंत येऊं दे कीं?

**गजी**—( आंतून ) खरेंच काय? आपल्या यजमानांना सांगा, जा आतां, वेळ होऊन गेली.

**धर्म्या सारं०**—काय आतां हंसावें कीं–गजे ! बोलत होतों आतां-कां घालूं बिलूं का इकडून सोडगा ?

**गजी**—( आंतून ) मग इकडून कांहीं दुसरेंच मिळेल, बरें काय? समजलां का काय तें ?

**धर्म्या शृं०**—( आंतून ) गजू, गजीच का तुझें नांव ? वा: ! खासा जबाब दिलास.

**हेम० सारं०**—अरे ए, गधड्यांनो ! काय, आह्मांला आंत येऊं द्यायाचें कीं नाहीं ?

**गजी**—(आंतून)मी पण आतां तेंच कीं विचारीत होतें !

**धर्म्या शृं०**—( आंतून ) आणि नाहीं ह्मणून तर सांगितलेंच कीं होतें !

**धर्म्या सा०**—हे कांहीं अशानें ऐकत नाहींत. उघड ! हें बघ, उघडतेस कीं नाहीं आतां ?

**हेम० सा०**—कारट्यांनो, येऊंद्या एकदा मला आंत.

**गजी०**—( आंतून ) तुह्मांला पाहिजे तरी कोण ?

**धर्म्या सा०**—महाराज, आतां दार फोडलें पाहिजे.

**गजी**—( आंतून ) डोकें फोडून घे मेल्या आपलें.

**हेम० सा०**—जर का दार फोडावें लागलें, तर मात्र मग खूब याद ठेवा !

**गजी**—( आंतून ) याद चांगली आहे; दारें फोडतात त्यांच्याकरितां चावडीवर खोडा तयारच आहे.

**तारा०**—( आंतून ) काय आहे गे गजे ? कोण गे मेले दांडगे, दाराशीं उगाच धिंगाणा मांडला आहे हा !

**धर्म्या शृं०**— ( आंतून ) मला वाटतें, तुमच्या या गांवांत चावनट पोरें फार भरलीं आहेत.

**हेम० सा०**—कोण ती ? तूंच कायग ? आणि जरा आधीं आली असतीस तर गे ?

**तारा०**— ( आंतून ) कोणगे हा मेला, मला अगे अगे ह्मणतो ! चल जा मेल्या एथून निघून !

**धर्म्या सा०**—महाराज, हा कोण गलेलठ आंत बसून गोष्टी सांगतो आहे, याचा मी आधीं समाचार घेतों.

**जगजीवन**—कसें काय महाराज ! एथें आज खाण्या-पिण्यालाही नाहीं, आणि अगत्यही नाहीं ! दोहोंतलें एक जरी असतें तरी बरें होतें !

**ताराचंद**—पण मघाशीं वाद चालला होता, तेव्हां एकावर समजूत होत नव्हती !

**धर्म्या सा०**—महाराज, ते दारांतच उभे आहेत. त्यांना असें इकडे यावयाला आग्रह कराना ? ह्मणजे एक आग्रह तर झाला.

**हेम० सा०**—आज कसें काय वारें फिरलें आहे कळत नाहीं !

**धर्म्या सा०**—वारें आडवें आलें आहे ह्मणा ! आंत पहा स्वयंपाक तयार असून आमच्या तोंडांत पडत नाहीं !

**हेम० सा०**—जा रे, जा कसा. कांहीं तरी घेऊन ये. मी हें दार फोडल्याशिवाय आतां ठेवीत नाहीं.

**धर्म्या शृं०**—( आंतून ) दार फुटलें तर मुसकट पण फुटेल, हें माहीत आहेना ?

**धर्म्या सा०**—याच्या तोंडाशीं लागून कांहीं उपयोग नाहीं. तावडीस सांपडला पाहिजे गुलाम ! बायक्यासारखा आंत बसला आहे.

**धर्म्या शृं०**— (आंतून) वेळ आली म्हणजे बाहेर पण येईन, अवकाश असेल तर.

**हेम० सा०**—धर्म्या, जा, एखादी पहार घेऊन ये.

**ताराचंद**—आतां थांबा. हें असें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपलीच मांडी आपण उघडी करून दाखविण्यांत काय हांसल आहे? आपल्या पत्नीच्या निर्दोष कीर्तीविषयीं आपणच आपल्या दारावर बोट ओढून ठेवणें हें शहाणपण नव्हे. तिचें वय, सद्गुण, मर्यादशीलपणा, शहाणपणा हीं सर्व लक्षांत आणा; आणि हा जो आतां सर्व विपरीत प्रकार दृष्टीस पडतो आहे, तो तिच्या बुद्धीनें कांहीं योग्य कारण असल्याशिवाय होत असेल काय, याचा विचार करा. चला, आतां आपण केदारेश्वराकडे जाऊं. तिकडे आपली सर्व तजविज यथास्थित होण्याजोगी आहे. संध्याकाळीं आपण येथें या, आणि ही अशी बंदी कां केली होती तें विचारून घ्या. आतां आपण एथें जबरदस्तीचा प्रकार करूं लागलों तर सारी पेंठ धांवत येईल. आणि मग लोकांच्या तोंडाला हात लावतां येणार नाहीं. कुचेष्टेला नखाग्र इतकी जरी जागा सांपडली तरी तितक्यावर ती आपलें गारुड चालवील; आणि एक नवें आडनांव बनवून तें तुमच्या नांवास जोडून देईल. म्हणून मी इतकें सांगतों.

**हेम० सा०**—तुमचें म्हणणें यथार्थ आहे. आतां एथून मुकाट्यानें जावें हें बरें. या वेळीं जरी मन ठिकाणीं नाहीं, तरी तें मौजेमधेंच आहे असें दाखविलें पाहिजे. आज एके ठिकाणीं गाणें आहे. तेथील हावभावांत कांहीं अर्थ नाहीं, परंतु गाणें खुबीदार असतें. तर भोजन आटोपून घटकाभर तेथें घालवूं. येथें पहा, असा कधीं घरीं आलों म्हणजे

अनेक तऱ्हेचें बोलणें उगीच कधीं कधीं ऐकून घ्यावें लागतें. चला आपण जाऊं. जगजीवनजी, तो कंठा आतां झाला असेल, तर तेथेंच गाण्याच्या ठिकाणीं घेऊन या. तुह्मांला जागा ठाऊक आहेच. आपल्याला काय, ज्या ठिकाणीं आपलें समाधान होईल तेथेंच कंठा गळ्यांत घातला. घरांत तरी काय आहे ? दुसरीकडे कोठें गेलों तर असें कधीं कोणी करीलसें वाटत नाहीं.

**जगजीवन**—मी आपल्याला जोगेश्वरीच्या गल्लींत येऊन भेटतों.

**हेम० सा०**—फार चांगलें. ही आज थट्टा झाली असेल, पण येणेंकरून माझ्या पदराला बराच खार लागणार आहे.

( निघून जातात. )

---

प्रवेश दुसरा.

**स्थल—चिमणबाग.**

[ भानुमती आणि हेमकांत शृंगारपुकर येतात. ]

**भानु०**—काय हो भावोजी, आपल्या बायकोशीं कसें वागावें, आणि तिला कसें वागवावें, हें खरेंच का तुह्मी विसरलां? तुह्मी दोघेंही अगदीं तरुण असतां इतक्या लवकर तिच्यावरचें तुमचें प्रेम उडावें काय? काय चमत्कार आहे! काल किहो ती तुमच्या किती प्रीतींतली होती? आणि असा एकाएकी त्या प्रीतीचा ऱ्हास व्हावा काय? तुह्मी माझ्या बहीणीला जर तिच्या जवळच्या द्रव्याकरितां वरिलें असेल तर त्याच द्रव्याकरितां तरी तिच्यावर कांहीं अधिक माया दाखवा. आणि तुमचें मन दुसरीकडे कोठें गेलें असलें तर तें गुप्त ठेवा, आणि तुह्मांला चोरून काय

करावयाचें असेल तें करा. भलतीकडेच जर तुमचें प्रेम गेलें आहे, तर तें कांहीं तरी लपवा. तुमच्या डोळ्यांवरून तें माझ्या तारामतीला उघड दिसतें, हें चांगलें का? बाहेर खरोखरच कोणी मोहनी घातली असली, तर त्याची तोंडानें फुशारकी मारूं नका. तिच्याकडे प्रेमाच्या दृष्टीनें पहा, गोड बोला, आणि तुह्मी वाईट असलां तर तिला तें दिसूं देऊं नका. दुर्गुण जरी तुमच्या अंगीं असला, तरी त्याचा वेष पालटून तो सद्गुणासारखा दिसूं द्या. तुह्मांला व्यभिचारच जर करावयाचा असला तर तो तिला कळविण्यांत कांहीं पुरुषार्थ आहे का? कोणी चोरी केली तर तिजबद्दल तो प्रतिष्ठा मिरवितो काय? तुमचे पहा दोन अपराध झाले. एक, तिला फसवून वाईट कृत्य केलें हा; आणि दुसरा, जेवायाच्या वेळीं उघडपणीं ते तिच्या लक्षांत आणून दिलें हा. शरमेजोगें एखादें काम केलेलें जर लपविलें तर इतकें वाईट दिसत नाहीं. पापी मनुष्य जर तोंडानें वाईट बोलणारा असला तर तें पाप दुप्पट होतें. ईश्वरा, काय ही बायकांची दशा! पुरुषांनीं कितीही वाईट कृत्यें केलीं तरी आह्मीं निमूटपणें बसावें, एक शब्दही तोंडावाटे काढूं नये! खरोखरी आमची जात किती गरीब आहे बरें! आह्मी पहा इतक्या मायाळू व इतक्या भोळ्या आहों,— तुमचें आमच्यावर प्रेम आहे, असें उगीच आमच्या मनांत एकदां भरवून द्या ह्मणजे झालें, मग तें खरें असो किंवा खोटें असो. अंतःकरण जरी दुसरीजवळ असलें, तरी बाहेरून आह्मांला प्रेम दिसलें ह्मणजे झालें. खरोखरी हात दुसऱ्यापाशीं असला आणि आह्मांकडे नुसती अस्तनी असली, तरी ती आह्मांला प्रिय आहे. आह्मी केवळ

बाहुलीं आहोंत; आणि आमचीं सूत्रें तुमच्यापाशीं आहेत. तुह्मीं जसें नाचवाल तशीं आह्मी नाचतों. तर भावोजी, तुह्मी एकदा आंत जा. तारामतीची समजूत करा. तिला खूष करा, 'प्राणसखे' असें ह्मणा. अशा वेळेस थोडासा दांभिकपणा करून फसवलें तर त्यांत कांहीं फारसें पातक नाहीं. हें वाईट खरें; परंतु दुसरा कांहीं उपायच नाहीं, तेव्हां मी हें सांगतें. तुमच्या मनांतून जरी नसलें, तरी अशा रीतीनें आर्जव केलें ह्मणजे तंटा मिटेल.

**हेम० शृं०**—हे सुंदरी, तुझें दुसरें नांव काय आहे, हें मला माहीत नाहीं; आणि तुला माझें नांव कसें समजलें हेंही मला माहीत नाहीं. असो. हे सुंदरी, तुझें ज्ञान, तुझें स्वरूप, आणि तुझें शहाणपण हें कांहीं इहलोकींचें दिसत नाहीं. आणि माझें नांव वगैरे सर्व तुला माहीत आहे, हा मोठाच चमत्कार! तूं खचित स्वर्गातली रंभा मला मोहपाशांत घालायाला आली आहेस. बरें, असें ह्मणावें तर मीं तरी इतकें काय केलें आहे? मी कसली मोठी तपश्चर्या करून इंद्रपद घ्यावयाला पहातों आहें, कीं त्यावरून इंद्रानें मजकडे रंभा पाठविली? असो. हें माझें सुकृताचें फळ, दुसरें कांहीं नाहीं. हे सुंदरी, स्त्रियांशीं कसें बोलावें हें मला खरोखरी ठाऊक नाहीं. तूं मला शिकीव; बोलावें कसें, वागावें कसें, आणि मनांत तरी काय आणावें, तें मला तूं सांग. तुझें बोलणें, त्याचें तात्पर्य, व त्याचें इंगित मला कांहीं समजत नाहीं. ही खचित स्वर्गलोकची भाषा असली पाहिजे. हे प्रिये, तुझी भाषा मला शिकीव. असा शिक्षक मिळाला तर किती गोड बरें! काय सांगूं? हे सुंदरी, तुमच्या स्वर्गांतील भाषेंत चुंबनाला काय ह्मणतात

बरें ? तुमच्या भाषेंतील एक मात्र मखी मला समजली. ‘ मला वर ’ असें ह्मणायाचें असलें ह्मणजे ‘ माझ्या भगिनीला वर ’ असें ह्मणावें. दुसरें कांहीं अजून समजलें नाहीं. आमची काय मृत्युलोकची भाषा, आणि आह्मी अडाणी, अशक्त, निस्तेज, हलकीं माणसें. आह्मांला तुमचें हें बोलणें कसें समजतें ? असो. हे सखे, माझ्या मनाचा जिकडे कल आहे तिकडील सर्व सोडून जिकडे माझें मन मुळींच जात नाहीं तिकडे पहायाला तूं कां सांगतेस ? तूं कोणी देवता आहेस काय ? तुझ्या मनांत माझी वृत्ति व माझा स्वभाव पालटावा असें आहे काय ? तुझ्या मनांत मला पुन्हा जन्मास घाला-याचें आहे काय ? बरें तर होऊंदे. ह्मणजे तूं ज्या पाशांत मला घालते आहेस त्यांत मी खुषीनें पडेन. पण मी जो होतों तोच जर आहें, तर मला पक्कें माहीत आहे कीं, तुझी ती रुदन करणारी बहीण माझी बायको नव्हे, आणि तिचा माझा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. माझें प्रेम ह्मण-शील तर सर्व तुझ्यावर आहे. तर हे सुंदरी, तूं असें करूं नको. आधीं बोलून बोलून मोहपाशांत घालावें, आणि मी अगदीं धुंद आणि वेडा झालों ह्मणजे ह्मणावें ‘ मी नाहीं ’ ! आणि आपली बहीण पुढें करावी ! हे स्त्रिये, तूं मला आपल्या पाशांत घाल ह्मणजे मी तुझ्या प्रेमडोहांत बुडा-लोंच असें समज.

भा०—काय हें ? तुह्मी बोलतां तरी काय ? तुह्मांला वेड तर लागलें नाहींना ?

हे० शृं०—वेड नाहीं हो, पण थोडा भ्रमिष्ठ झालों आहें; कसा झालों माहीत नाहीं.

**भा०**—हें सगळें तुमच्या डोळ्यांचें पाप आहे. डोळे भलतीकडेच गेले ह्मणून हें असें झालें.

**हेम० शृं०**—हो. असा स्वयंप्रकाश चंद्र पुढें असला ह्मणजे त्याच्याकडे पाहून असें मन भ्रमिष्ठ होतें.

**भानु०**—जिकडे पहायाचें तिकडे पहावें ह्मणजे डोळे चांगले होतील.

**हेम० शृं०**—हे प्राणप्रिये, जिकडे पहायाचें तिकडेच पहातों आहें, अंधाराकडे पहावें त्यापेक्षां डोळे झांकावे हेंच बरें.

**भानु०**—आपण "प्राणप्रिये" असें मला कां ह्मणतां? माझ्या बहिणीला ह्मणा.

**हेम० शृं०**—तुझ्या बहिणीच्या बहिणीला ह्मणतां.

**भानु०**—ह्मणजे माझ्या बहिणीला?

**हे०शृं०**—नाहीं-ह्मणजे तुला. हे सुंदरी, तूं माझी अर्धांगी प्राणप्रिया, माझ्या अंतःकरणपूर्वक प्रीतीचें स्थान आहेस. हे विशाललोचने, या जगांत माझें सर्वस्व काय तें तूं आहेस. माझें अमोलिक रत्न, माझा प्राण, माझें जीवन, माझें ऐश्वर्य, माझें स्वर्गसुख सर्व तूं आहेस ग प्रिये.

**भानु०**—हें सर्व माझ्या बहिणीविषयीं आहे. नसलें तर असावें.

**हेम०शृं०**—हे प्रिये, तुझ्या बहिणीवर माझें प्रेम असावें ह्मणशील, तर तूं आपल्यालाच बहीण ह्मणून घे ह्मणजे झालें. माझी तूं प्राणप्रिया होशील आणि तुजशीं मी लग्न करीन. तुला पति नाहीं आणि मला पत्नी नाहीं. आतांच आपण गांधर्वविवाह करूं.

**भानु०**—थोडे थांबा, हलूं नका इथून. मी आपल्या बहिणीला घेऊन येतें. (निघून जाते.)

( धर्म्या शृंगारपुरकर धांवत धांवत येतो )

हे० शृं०—कायरे झालें धर्म्या ? धांवत धांवत कोठें चाललास ?

धर्म्या शृं०—महाराज, तुह्मी मला खरेंच ओळखलें का ? मी धर्म्या खराच का ? मी तुमचा चाकरच का ? हाच का मी ? ओळखलात का पक्का ?

हेम० शृं०—तूंच धर्म्या, आणि तूंच माझा चाकर. पण तूं हा भांग प्याल्यासारखें काय करतोस ?–हा मी का तो मी ?

धर्म्या शृं०—मी गाढव आहें. मी एका रांडेचा चाकर आहें. हा मी नव्हे हो नव्हे. मला खरीच भ्रांति पडली आहे. मी भ्रमिष्ठ झालों आहें. मी भांग न पितां भंगिष्ठ झालों आहें.

हे० शृं०—कोणतें रांडरूं तुला चाकर ह्मणतें ? आणि भंगिष्ठ कसा झालास ?

धर्म्या शृं०—महाराज, काय सांगूं, खरोखरीच कोळशांतलें माणिक हो. ती मला आपला गुलाम ह्मणते. ती ह्मणते–तूंच माझा नवरा,–माझ्यावर मालकी चालविते, आणि मला सोडीत नाहीं हो ! मला लपवा तरी कोठें !

हे० शृं०—ती कशी तुझ्यावर मालकी चालविते ?

धर्म्या शृं०—जशी तुह्मी आपल्या घरच्या घोड्यावर चालवितां कीं नाहीं त्याप्रमाणें. खरेंच, ती मला जनावराप्रमाणें वागविते. ह्मणजे मला जनावर समजून तसें वागविते असें नाहीं, तर ती घाणेरड्या जनावरासारखी असून माझ्यावर आपला हक्क चालविते.

हेम० शृं०—ती आहे तरी कोण ?

धर्म्या शृं०—कोण ह्मणून काय सांगूं ? मोठी पोक्त–ह्मणजे अगदींच थेरडी हो ! आणि इतकी स्वच्छ कीं, नांव

घेतलें कीं सचैल स्नान करावें. हें लग्न झालें तर माझें नशीब मोठें राठ समजा. पण महाराज, लग्न चबचबीत होईल.

हे० शृं०—लग्न चबचबीत रे कसें ?

धर्म्या शृं०—चबचबीत रे कसें ? ह्मणजे महाराज, आमच्या प्रियपत्नीच्या अंगावर सगळें दिपुष्टाचें तेल ! कांहीं अंगाला लागलें कीं, घातला सगळा हात दिव्यांत अंग पुसायासाठीं ! स्वैंपाक करतांना फोडणीच्या तेलांतलें अर्ध अंगावर व अर्ध तोंडांत ! सगळें अंग तें नेहमीं लिपलिपीत ! ती जवळ आली ह्मणजे इतका अंधार पडतो कीं, मला वाटतें त्या मोठ्या धिप्पाड शरीराला द्यावी आग लावून;—जळायाला तेल कांहीं कमती तर नाहीं—आणि जाळ झाला ह्मणजे त्याच उजेडानें जावें पळून, आणखी काय !

हे० शृं०—तिचा वर्ण तरी कसा आहे ?

धर्म्या शृं०—मांगणी, महारणी, धेडांच्या बायका देखील चांगल्या असतात. मला नाहीं ही जात ठाऊक.

हे० शृं०—अरे जात नव्हे रे. रंग कसा आहे तिचा ह्मटलें.

धर्म्या शृं०—रंग काय विचारतां, नेहमीं रंगेल. मला नको तिचा रंगेलपणा महाराज.

हे० शृं०—काय मूर्ख आहेस रे ! ती काळी आहे कीं गोरी आहे ?

धर्म्या शृं०—गोरी ह्मणजे काय महाराज ? मी इतका वेळ तिच्या प्रकाशांत होतों तो आतां बाहेर आलों, तों डोळे दिपले. एक रंग मला माहीत. गोरें बिरें सगळें विसरलों. ह्मशीच्या रंगाला देखील गोरा ह्मणेन आणि ह्मशा मोठा सडपातळ ह्मणेन आजपासून.

हे० शृं०—तिचें नांव तरी काय आहे ?

**धर्म्या शृं०**—नांव महाराज? गजी. गजी ह्मणजे हत्तीण नव्हे हो महाराज. हत्तीण काय या शरीरापुढें? गजी कां ह्मटलें सांगतों. ह्मणजे आपलें शरीर मोठें ह्मणून जर कोणाला 'ग'ची बाधा झाली आणि तो सगळ्यांना 'अरे जारे' ह्मणूं लागला, कीं न्यावा तिच्याकडे, ह्मणजे लागलाच 'जी महाराज' असें ह्मणूं लागेल. नाहीं तर महाराज, ही पृथ्वी मोजायचा गज असेल ह्मणून हिचें नांव गजी. दोन चारदां उलथी पालथी केली, कीं पृथ्वीची प्रदक्षिणा आणि धरणीकंप बरोबरच! महाराज, तुह्मांला आतां थोड-क्यांत एवढेंच सांगतों. ती मला ह्मणाली–तूं माझा नवरा, मला धर्म्या या नांवानें देखील हाक मारूं लागली. शपथ वाहूं लागली कीं, मी तिला वरण्याचें कबूल केलें. आणि माझ्या सगळ्या खाणाखुणा, तीळचीळ कोठें आहेत तें सगळें सांगूं लागली. तेव्हां मला फार आश्चर्य होऊन मी गर्भगळीत झालों, आणि ती कोणी डाकीण असेल असें समजून मी आपला तुह्मांकडे पळून आलों. मी जर आलों नसतों तर तिणें मला कुत्रें नाहीं तर मांजर करून आपल्या-जवळ ठेवलें असतें.

**हे० शृं०**—जा तूं आतां धांवत धांवत बंदरावर, आणि समुद्रांत कोणत्याही दिशेला जावयाला जर वारा अनुकूळ असला, तर आज रात्रीं एथें रहावयाचें नाहीं. जर एकादें गलबत जाणार असेल तर मोतीचौकांत ये. तिथें मी इत-क्यांत येतों. सर्व मनुष्यें आपणाला ओळखतात आणि आपण कोणाला ओळखत नाहीं, ही स्थिति चांगली नाहीं. आपण आपलें इथून निघून जावें हें बरें.

**ध० शृं०**—अस्वलापासून मनुष्य जसें जीव घेऊन पळतें

तसें मला त्या लोधीपासून पळावेंसें वाटतें. ( पळत जातो. )

**हेम० शृं०**—एथें सगळ्या जाखाई जोखाई, भुतें, पिशाच, ब्रह्मराक्षस, समंध आणि डाकिणी राहतात, दुसरें कोणी नाहीं. आतां येथून गेलेंच पाहिजे. जी मला पति ह्मणते, तिचें तोंड मला दृष्टीस पहायास नको. पण जी तिची सुंदर भगिनी आहे तिचें रूप किती अवर्णनीय!—भाषणाची पद्धत कशी मनोहर!—जवळ बसलें ह्मणजे मन कसें मोहून जातें!—स्वर कसा मधूर! ती खरोखरीच अप्सरा असली पाहिजे. तिला पाहिलें ह्मणजे मन कांहीं स्वाधीन रहात नाहीं. मला वाटतें, मी एथें एक दिवस राहिलों तर भ्रष्ट होईन. पण नाहीं नाहीं. आपल्या प्रिय पित्याच्या नांवाला कलंक लावावयाचा नाहीं. आज इथून जावें आणि तिचें तोंडच पुनः पाहूं नये ह्मणजे झालें.

( जगजीवन कंठा घेऊन येतो. )

**जग०**—हेमकांत महाराज!

**हेम० शृं०**—होय, हें माझेंच नांव.

**जग०**—मला ठाऊक नाहीं कीं काय? हा कंठा आणला आहे, पहा. तुमची जोगेश्वरीच्या बोळांत गांठ पडेल ह्मटलें होतें, पण कंठा पुरा झाला नव्हता ह्मणून वेळ लागला.

**हेम० शृं०**—आपली काय मर्जी आहे? हा कंठा घेऊन मी काय करावें?

**जग०**—तुह्मांला जें पाहिजे तें करा. मी हा तुमच्याकरितां केला आहे.

**हेम० शृं०**—माझ्याकरितां? मीं नाहीं कधीं सांगितला करायाला.

**जग०**—एकदां नाहीं, दोनदां नाहीं, पन्नासदा सांगि-

तला ! घरीं घेऊन जा, ह्मणजे बाईसाहेब खूष होतील. असा कांहीं मोठा दागिना केला ह्मणजे सणाविणाला आपलें आमंत्रण यायाचेंच, आणि खाशा पंक्तीला जेवढीं पक्वानें तेवढींच मला. मी आपला आज संध्याकाळीं जेवायाच्या वेळेसच येईन, मग द्या तुह्मी किंमत चुकवून.

**हे० शृं०**—आपली किंमत आतां घ्या. न घ्याल तर पैसाही नाहीं आणि मीही दृष्टीस पडावयाचा नाहीं.

**जगजीवन**—आज मोठ्या मौजेंत आहां मला वाटतें. काय ही थट्टा ? बरें जयगोपाळ. ( जातो. )

**हे० शृं०**—याचा काय अर्थ ? हें मला कांहीं समजत नाहीं. परंतु एवढें खरें, इतका कोणी मूर्ख नसेल कीं, घरीं चालून आलेल्या लक्ष्मीला घालवून देईल. असला कंठा कां टाकून द्यावा ? आतां हें उघड झालें कीं, एथें चरितार्थ चालवायाला उद्योग करायाला पाहिजे किंवा लबाडी करायाला पाहिजे असें नाहीं. एथें आपलें रस्त्यांत सोनें फुकट मिळतें. आतां मोतीचौकांत जावें आणि धम्यांची वाट पहात बसावें; आणि एखादें गलबत असलें तर आपलें मुकाट्यानें निघून जावें. ( जातो )

## तिसरा अंक समाप्त.

## अंक चवथा.

### प्रवेश पहिला.

[ एक व्यापारी, जगजीवन, आणि जमादार येतात. ]

**व्या०**—गतवर्षी सूर्यग्रहण आलें होतें तेव्हांच हें कर्ज फेडण्याची मुदत भरून गेली. मीही तुला तगादा केला नाहीं, आणि आजही केला नसता; परंतु मला सिंधुदेशीं जाणें जरूर आहे, आणि वाटखर्चाला तर पाहिजे. तेव्हां माझें द्रव्य मला आतां दे, नाहीं तर मी तुला या जमादाराच्या स्वाधीन करितों.

**जग०**—ऐक, जितकें द्रव्य मीं तुझें देणें आहे तितकेंच माझें हेमकांताकडे येणें आहे; आणि तुझी माझी गांठ पडली त्याच्यापूर्वी नुकताच त्याला मी कंठा दिला. त्याची किंमत मला आतां पांच वाजतां मिळेल. तर एवढी मजवर कृपा कर आणि मजबरोबर त्याच्या घरीं चल; ह्मणजे मी तुझें सगळें कर्ज देऊन टाकतों.

( हेमकांत सारंगपुरकर आणि धर्म्या सारंगपुरकर येतात. )

**जमादार**—त्याच्या घरीं जाण्याचे श्रम वांचले. हे पहा, तेच इकडे येत आहेत.

**हेम० सा०**—मी जरा सोनाराच्या घरीं जाऊन येतों, इतक्यांत तूं एक चांगला चाबूक बाजारांतून विकत घेऊन ये; दिवसाढवळ्या दरवाजाला कडी लावून घेऊन मला बाहेर ठेवलें याबद्दल बायकोचा आणि तिचे साथी असतील त्यांचा एकदा समाचार घ्यावयाचा आहे. अरे पण थांब, हा पहा तो सोनार. बरें तूं आपला जा, आणि चाबूक घेऊन मला घरीं आणून दे.

**धर्म्या सा०**—चला आतां शान चाबूक आणला पाहिजे ! ( जातो. )

**हेम० सा०**—( जगजीवनास ) वा:, शहाण्या मनुष्यानें तुजवर भरंवसाच ठेवूं नये. तूं ह्मणालास—मी तुह्मांला भेटायाला येईन आणि कंठा आणून देईन. मी इतका वेळ वाट पाहिली, पण सोनारही नाहीं आणि कंठाही नाहीं. तुला वाटलें कीं, एकदां कंठा दिला ह्मणजे आमचे कंठांचें एकमेकांशीं बंधन होऊन आमचें प्रेम फार दिवस राहील. ह्मणून कंठा आणिला नाहींस होय ?

**जग०**—बरें आतां तुमची थट्टा पुरे करा. ही पहा रायचंदाची टीप. सोनें कोणत्या कसाचें आहे आणि त्याचें वजन काय आहे हें सर्व यांत लिहिलें आहे. याची सगळी किंमत मी या गृहस्थाचें जें देणें आहे त्यापेक्षां तीन होन जास्ती आहे. आतां एवढी मेहेरबानी करा कीं, यांच्या ऋणांतून मला मुक्त करा. कारण यांला दूरदेशीं जावयाचें आहे, आणि फक्त त्याकरितां यांचा खोळंबा झाला आहे.

**हेम० सा०**—शेटजी, माझ्याजवळ आतां एथें इतकें द्रव्य नाहीं, आणि मला थोडें चौकांत काम आहे. तेव्हां तुह्मी या गृहस्थाला माझ्या घरीं घेऊन जा आणि आपल्या बरोबर कंठाही घ्या. आणि तो माझ्या कुटुंबाच्या स्वाधीन करून तिच्यापासून किंमत घ्या, मी इतक्यांत घरीं येतों. कदाचित् तुमची माझी गांठ देखील पडेल.

**जग०**—तर मग तुह्मी स्वतः कंठा घेऊन याल ?.

**हेम० सा०**—नाहीं. तूं आपल्याच बरोबर घेऊन जा. मला उशीर लागला तर ?

**जग०**—बरें, मी घेऊन जातों. एथें आहे कंठा तुमच्या जवळ ?

**हेम० सा०**—वा:, मजजवळ नाहीं तर तुजजवळ तर असेल ? नसला तर तसाच रिकाम्या हातांनीं परत जा.

**जग०**—बरें, आतां उगीच उशीर नका लावूं, तो कंठा द्या इकडे. या गृहस्थाचें घोडें जीन घालून तयार आहे, आणि याचा इतका खोळंबा झाला याचा दोष सगळा माझ्या माथां आहे.

**हेम० सा०**—महाराज, अशा गमजा करूं नका. आपण बोलल्याप्रमाणें मला एथें कंठा आणून दिला नाहीं, तें छपविण्याकरितां ही सगळी गंमत चालली आहे वाटतें. याकरितां मी रागें भरायाचें तें आधींच एखाद्या दांडग्या बायकोसारखें आपणच हाका मारायाला लागलात ! अस्वलीच्या आधीं किंकाळी !

**व्यापारी**—अहो, वेळ चालला, चला आटपा.

**जगजी०**—( हेमकांतास ) पहातां ना कसा याचा मला तगादा आहे तो ? कंठा—

**हेम० सा०**—द्या माझ्या घरीं आणि घ्या आपली किंमत.

**जगजी०**—पुरे हो, तुह्मांला आतां मीं कंठा दिला. तो घरीं पाठवावा, नाहीं तर कांहींतरी आमच्या जवळ खूण द्या.

**हेम० सा०**—हें काय हें ? मरेपर्यंत थट्टाच ! चल दाखीव कुठें आहे तो कंठा.

**व्या०**—तुमची होते आहे थट्टा, पण मला नाहीं वेळ महाराज. बोला, मला काय तो जबाब द्या, नाहींतर मी या सोनाराला जमादाराच्या स्वाधीन करितों.

**हेम० सा०**—मी जबाब देऊं ? मी कां जबाब देऊं ?

**जग०**—मजपासून तुह्मी कंठा घेतला त्याचा पैसा तुह्माकडे येणें आहे, ह्मणून.

**हेम० सा०**—मला कंठा मिळेल तेव्हां मग देईन. आधीं कांहीं तुझें देणें लागत नाहीं.

**जग०**—आतां घटका झाली, मीं तुह्मांला कंठा दिला!

**हेम० सा०**—तूं मला कंठा दिला नाहींस आणि मी कांहीं तुझें लागत नाहीं. तूं न देतां चौघांदेखत दिला ह्मणतोस हें असें मजपाशीं चालणार नाहीं!

**जग०**—तुह्मी नाहीं ह्मणतां, हेंही मजपाशीं नाहीं चालणार. पहा, अशानें माझी पत नाहींशी होईल.

**व्या०**—अहो जमादार बोवा, हा माझा कर्जदार आहे, याला कैद करा.

**जमा०**—बरें बाबा, राजाची तुला द्वाही आहे, खबरदार येथून हाललास तर.

**जग०**—यांत पहा माझी अब्रू जाते. ह्मणून माझा पैसा याला द्या, नाहींतर याच जमादाराच्या हातून तुह्मांला कैद करवितों. असें करण्यांत काय बरें अर्थ आहे?

**हेम० सा०**—पैसा तुला देऊं? कधीं देणार नाहीं. मूर्खा, पहातों कसा मला कैद करवितोस तो!

**जग०**—जमादार साहेब, हें तुमचे कर्जाच्या कराचें द्रव्य घ्या आणि त्याला कैद करा. मी आपल्या भावाला देखील सोडणार नाहीं अशी जर तो माझी फजिती करील तर.

**जमा०**—(हेमकांतास) तुह्मी माझ्या अटकेंत आहां. तुह्मी एकिलीना फिर्याद?

**हेम०सा०**—मला जामीन मिळे तोंपर्यंत मी तुमच्या हुकमांत आहें. (जगजीवनास) मूर्खा, थट्टेचा परिणाम काय होतो

तो पहाशील ! पहा, मी तुला भिकेस लावतों कीं नाहीं तें !

**जग॰**—महाराज, कांहीं चिंता नाहीं. सारंगपुरांत माझा बरोबर न्याय होईल, याची मला पक्की खात्री आहे. तुह्मी मात्र आपली फजिती करून घेत आहां.

[ धर्म्या शृंगारपुरकर येतो. ]

**धर्म्या शृं॰**—धनीसाहेब, अंजनवेलची एक फतेमार आहे; तिचा धनी गांवांत गेला आहे. तो परत येई तोंपर्यंत तिचा मुकाम आहे, आणि मग लागलीच निघणार. आपलें सगळें सामान मीं वर चढविलें. वाटेनें लागणारे सर्व जिन्नस मीं विकत घेतले. गलबतावर सर्व तयारी झाली आहे. वारा शानदार आहे, फक्त धन्याची व आपली ते वाट पहात आहेत.

**हेम॰ सा॰**—कायरे ? कां वेडा झालास कीं काय ? गाढवा; कोणती अंजनवेलची फतेमार माझ्याकरितां खोळं बली आहे ?

**धर्म्या शृं॰**—तुह्मींच मला गलबताचा शोध करायाला पाठविलें ना ?

**हेम॰ सा॰**—रांडलेका, गाढवा, मी तुला चाबूक आणा याला पाठविलें, आणि चाबूक कशाला पाहिजे हें देखील तुला मीं सांगितलें !

**धर्म्या शृं॰**—महाराज, मला चाबकानें मारायाचा बेत आहे वाटतें? अहो, तुह्मीं मला गलबताच्या शोधास पाठविलें.

**हेम॰ सा॰**—बरें, मग फावल्या वेळीं याची वाटाघाट करीन, आणि माझी आज्ञा चांगलें लक्ष देऊन ऐकायाला तुझ्या कानांलाही शिकवीन. आतां नीट ऐक गाढवा. घरीं धांवत जा आणि तिच्याजवळ ही किल्ली दे; आणि तिला

सांग कीं—ज्या पेटींत काश्मिरी शालें आहेत, तेथेंच होनांची थैली आहे, ती दे ह्मणावें. तिला सांग, मला भररस्त्यांत कैद केलें आहे, आणि त्या द्रव्यानें माझी सुटका होईल. जा गुलामा, लवकर पळत जा. जमादारबावा, तो येईपर्यंत चला चावडीवर. ( व्यापारी, जमादार, जगजीवन, आणि हेमकांत सारंगपुरकर जातात. )

**धर्म्या शृं०**—यजमान ह्मणाले-तिच्याकडे जा, ह्मणजे ज्याठिकाणीं आपण जेवलों तेथें. ठीक आहे. यजमाचें जमलें संधान. मलाही त्या कोळशांतल्या माणकानें ह्मटलें कीं तूं माझा नवरा आहेस. ती इतकी लठ्ठ आहे कीं, माझ्या-सारखे चार धर्मे तिला पुरणार नाहींत. माझ्या मनांत जरी नाहीं तरी मला तेथें गेलें पाहिजे. कारण यजमानाची आज्ञा शिरसावंद्य आहे. ( जातो. )

---

## प्रवेश दुसरा.

[ तारामती आणि भानुमती येतात. ]

**तारामती**—ताई भानुमती, तुझ्याजवळ असें भलतें सलतें बोलणें झालें का? चर्येवरून, डोळ्यांवरून, तुला कांहीं दिसलें का? बोलणें झालें तें मनापासून का थट्टेनें? डोळे कसे लाल दिसले का तारवटलेले दिसले? मन कसें आनंदांत होतें का दुःखांत? सांग गे एकदांची, चर्येवरून तुला वाटलें तरी काय?

**भानु०**—पहिल्यानें ते ह्मणाले, तुझा आणि त्यांचा कांहीं संबंध नाहीं.

**तारा०**—ह्मणजे माझ्याशीं संबंध ठेवायाचा नाहीं? बरें तर मग, पहा कशी मी खोड मोडतें ती.

**भानु०**—मग शपथ वाहून ह्मणाले, या गांवांत माझी कोणाची ओळख नाहीं.

**तारा०**—असें काय ? किती खोटसाळपणा हा ? याला ह्मणावें तरी काय ?

**भानु०**—मग मी तुझेसाठीं त्यांची फार विनवणी केली.

**तारा०**—आणि मग काय ह्मणणें झालें ?

**भानु०**—जें मी तुझ्या साठीं मागितलें तेंच ते मला मागूं लागले.

**तारा०**—ह्मणजे ? नीट सांग बाई.

**भानु०**—वेडे, एवढें नाहीं कां मेलें समजत ? अग, मी ह्मटलें माझ्या तारामतीवर प्रीति करा, तिच्यावर प्रेम असूंद्या; याचें कांहीं उत्तर न देतां ते मला ह्मणाले–तूं मजवर प्रीति कर, मजवर तुझें प्रेम असूं दे.

**तारा०**—याला ह्मणावें तरी काय ? कोणत्या गे प्रकारच्या शब्दांनीं तुला त्यांनीं मोहपाशांत पाडण्याचा प्रयत्न केला ?

**भा०**—बाई, एखाद्या संभावित मनुष्याला मागणी करायाची असली ह्मणजे तो जसा बोलतो का नाहीं, त्याप्रमाणें ते मजशीं बोलले: पहिल्यानें माझें स्वरूप आवडलें असें दर्शविलें, आणि मग बोलणें.

**तारा०**—तूं त्यांच्याशीं वाटतें चांगलें चांगलें बोलत होतीस ?

**भा०**—थांब, धीर धरग बाई, मला सगळें सांगूं दे.

**तारा०**—नाहीं मी धीर धरायाची ! माझ्या मनांत जरी बोलायाचें नसलें तरी माझी जीभ नाहीं राहावयाची आतां ! असे दुष्ट, पापी, चांडाळ, निर्दय, कुचके, क्रूर मला आजपर्यंत माहीत नव्हते !

भा०—अग बाई, काय हें ? मांडलें आहेस तरी काय ? नवरा ना तो ? अग, इतका जर नवरा तुझा वाईट आहे, तर तुला त्याची इतकी पर्वा कां ?–आणि इतका हेवा तरी कशासाठीं ? असला वाईट नवरा निघून गेला तर बरेंच झालें. त्याचें दुःख कशाला ?

तारा०—अग, मीं असें ह्मटलें तरी ते माझ्या मनाला चांगले वाटतात. अग, काय करूं, माझ्या मनाला फार वाईट वाटतें,–दुसऱ्यांच्या डोळ्यांना ते इतके चांगले न दिसते तर बरें होतें. माझ्या तोंडांतून वाईट शब्द निघतात, तरी माझें मन त्यांचें बरें व्हावें ह्मणून देवाजवळ मागणें मागतें.

[ धर्म्या शृंगारपुरकर येतो. ]

धर्म्या शृं०—हां हेंच, इथेंच. चला पेटी-थैली-चला चला!

भा०—अरे, इतका तुला दम कशानें लागला ?

धर्म्या शृं०—धांवत धांवत आलों ह्मणून.

तारा०—धर्म्या, तुझे यजमान कोठें आहेत? बरे आहेत ना?

धर्म्या शृं०—अरे ? बरे कसचे ? त्यांची दशा विचारूं नका. त्यांच्या मागें लागली आहे अक्काबाई. ते आतां ज्या ठिकाणीं आहेत, त्यापेक्षां नरकवास बरा.–यमयातनाही फार उत्तम ! अरेरे ! फार फजिती ! एका दुष्ट लांडग्याच्या हातीं ते सांपडले आहेत. अहो, मी लांडगा काय ह्मणतों ! लांडगा बरा. हा तर गल्लींत, कोपऱ्यांत, बोळांत, जेथें मनुष्य सांपडेल तेथें पकडतो.

तारा०—अरे धर्म्या, काय, आहे तरी काय ?

धर्म्या शृं०—मला कांहीं ठाऊक नाहीं. त्यांना फिर्यादीवरून कैद केलें आहे, इतकें मात्र पाहिलें.

**तारा०**—काय, कैद केलें आहे? सांग सांग लवकर, फिर्याद कोणाची आहे?

**धर्म्या शृं०**—कोणाची फिर्याद हें मला ठाऊक नाहीं; परंतु त्यांला जमादारानें कैद केलें आहे एवढें मला माहीत आहे. बाई साहेब, त्यांना सोडवायाला त्यांच्या पेटींत जेवढी रकम आहे तेवढी द्या बरें लवकर.

**तारा०**—ताई, जा आण लवकर. (भानुमती जाते.) चमत्कार वाटतो, मला न कळतां त्यांना कर्ज व्हावें! अरे, फिर्याद कां खतावरून झाली आहे?

**धर्म्या० शृं०**—खतावरून नाहीं, कंठ्यावरून झाली आहे. हा पहा वाजला.

**तारा०**—काय कंठा?

**धर्म्या शृं०**—कंठा नाहीं घंटा. यावेळेस मला जायाला पाहिजे होतें. त्यांना सोडलें तेव्हां दोन वाजले होते; आतां एक वाजला.

**तारा०**—तास मागें फिरले वाटतें? हें मीं नाहीं कधीं ऐकलें.

**धर्म्या शृं०**—हो. तासाची आणि जमादाराची गांठ पडली ह्मणजे भीतीनेंच तो मागें पळतो.

**तारा०**—ह्मणजे जणूं कांहीं त्याला कर्जच आहे वाटतें! काय मूर्खासारखा बोलतोसरे तूं?

**धर्म्या शृं०**—काळ हा मोठा दिवाळखोर आहे; आणि त्याच्या शक्तीपेक्षां त्याला कर्ज फार असतें. आणि तो चोरही आहे. कसा पहा पटदिशीं निघून जातो. असा तो कर्जबाजारी आणि चोर आहे. आणि मध्यें कां जमादार भेटला, तर मग एका दिवसांत तो एक तासभर जर मागें सरला तर त्यांत काय नवल आहे?

[ भानुमती येते. ]

**तारा०**—धर्म्या, ही घे थैली. जा पळत तिकडे, आणि लवकर घरीं घेऊन ये. चल ताई, माझे जिवाची अगदीं चलबिचल झाली आहे. काय सांगूं बाई, माझ्या जीवाची अशी दशा आहे. ह्मणूनच मला सुख होतें, आणि त्यामुळेंच दुःख होतें. ( जातात. )

प्रवेश तिसरा.

[ हेमकांत शृंगारपुरकर येतो. ]

**हेम० शृं०**—काय चमत्कार! ज्याला भेटावें तो जय-गोपाळ किंवा नमस्कार करितो,–जशी कांहीं माझी त्याची चांगली ओळखच आहे! आणि प्रत्येक मनुष्य मला नांवानें हाक मारतो! कोणी मला पैसा देतात; कोणी घरीं बोलावितात; कोणी ह्मणतात, तुमचे आह्मांवर मोठे उपकार झाले; कोणी ह्मणतात, हें विकत घ्या. आतांच एका शिंप्यानें आपले घरीं बोलाविलें आणि ह्मणाला–"हें पहा तुमच्याकरितां मीं रेशमी कापड विकत घेतलें आहे." असें ह्मणून माझ्या अंगाचा बेत घेतला! खचीत हें सर्व पुर मायेचें आहे, किंवा एथील सर्व लोक ज्यादूवाले असावेत.

[ धर्म्या शृंगारपुरकर येतो. ]

**धर्म्या शृं०**—धनीसाहेब ही पहा होनांची थैली तुह्मीं मला आणायाला सांगितली होती ती. कां त्या काळाच्या हातून तुह्मी सुटलां वाटतें?

**हेम० शृं०**—कोठली होनाची थैली ही? आणि काळ कोण?

**धर्म्या शृं०**—अहो स्वर्गातला काळ नव्हे. तुरुंगावरचा

काळ,—त्याचें पोट लोकांच्या मूर्खपणावर व दुर्वर्तनावर चालले आहे. तो तुह्मांला मघाशीं तुरुंगांत नव्हता का नेत ?

**हेम० शृं०**—तुझें बोलणें मला तर कांहीं समजत नाहीं.

**धर्म्या शृं०**—नाहीं ? गोष्ट तर स्पष्ट आहे. तुह्मांला पकडून घेऊन तो तुरुंगाकडे चालला होता ना ? कोणी थकला असला तर तो त्याला विश्रांतीच्या ठिकाणीं नेतो, आणि घराचें भाडें मागत नाहीं. जुनीं वस्त्रें घेऊन नवीं देतो, आणि अंगावर कांहीं नसलें तरी सांखळ्या करून घालतो तो !

**हेम० शृं**—कोण ? तुरुंगावरचा जमादार ?

**धर्म्या शृं०**—होय तोच. कोणी आपल्या करारामाणें वागला नाहीं तर त्याचा आणि तसाच चोराचा समाचार घेतो, तो तोच.

**हेम० शृं०**—पुरे मूर्खा तुझी थट्टा. आज रात्रीं आपणाला येथून निघून गेलें पाहिजे. एखादें आज जाणारें गलबत आहे काय ?

**धर्म्या शृं०**—महाराज, एक घटका झाली, तुह्मांला मी येऊन सांगितलें कीं, फतेमार आज रात्रीं निघणार आहे. त्याच वेळेस तुह्मांला जमादारानें पकडलें होतें, आणि तुह्मी तुरुंगाकडे चाललां होतां. तुमची सुटका होण्याला तुह्मी मला होन आणायाला पाठविलें, ते हे मीं आणले आहेत.

**हेम० शृं०**—या बेट्याला वेड लागलें ! तसेंच मलाही लागलें आहे, आणि एथें आह्मी मायापाशांत सांपडून भटकतों आहों. ईश्वरा, यांतून आह्मांला लवकर सोडीव !

[ एक वेश्या येते. ]

**वेश्या**—हेमकांत महाराज, बरें झालें, ठीक झालें, आपली गांठ पडली. आपल्याला एकूण सोनार भेटला.

हाच का तो कंठा आपण मला आज देतों ह्मणून कबूल केला होता तो ?

**हेम० शृं०**—चल निघ एथून सटवाई ! तूं काय मला भुलवायाला आली आहेस ?

**धर्म्या शृं०**—महाराज ही काय सटवाई आहे ?

**हेम० शृं०**—अरे, ती हडळ आहे.

**धर्म्या शृं०**—ती हडळीची आई आहे ! नाहीं बहीण आहे. पहा बरें, जवळ येऊन तर पहा.

**वेश्या**—तुह्मी आणि तुमचा चाकर आज मोठ्या गमतींत आहां. थट्टेशिवाय तुह्मांला कांहीं सुचत नाहीं. गाणें ऐकायाला यायाचें होतेंना ? मजबरोबर चलतां आतां ? चला.

**धर्म्या शृं०**—महाराज, ठीक आहे, चला सटवाईबरोबर. आणखी कांहीं जेवाबिवायाचा बेत असला तर पोटबिट मोठें करा, बरें का ? आह्मांला काय करावयाचें आहे ह्मणा !

**हेम० शृं०**—कां रे धर्म्या ?

**धर्म्या शृं०**—अहो, सटवाईबरोबर जेवायाचें आहे, आणि कां ह्मणून काय विचारतां ?

**हेम० शृं०**—हात् जखणी ! जा एथून निघून. मला बोलावतेस काय ? रांडे, तूं कोणीतरी डाकीण आहेस, आणि तुह्मीं सगळीं एकसारखीं एथें भरलीं आहां !

**वेश्या**—तुह्मीं मघाशीं माझी आंगठी घेतली होती, ती द्या आपली माझी मला परत; नाहीं तर, तुह्मीं कंठा देतों ह्मणून कबूल केलें तो द्या. माझ्या हिऱ्याची किंमत फार आहे, बरें का ? द्या लवकर ह्मणजे मी जातें निघून; तुह्मांला त्रास द्यायाला नाहीं रहात.

**धर्म्या शृं०**—कांहीं भूतें असतात तीं अंगांत येतात, कांहीं कोंबडीं मागतात, कांहीं अन्न मागतात. या भुताला सोन्याची लालुच दिसते. महाराज, देऊं नका या भुताच्या हातीं कंठा; दिलात तर आपल्याला तें जास्तीच भय दाखवील.

**वेश्या**—हें काय हो? माझी आंगठी द्या, नाहीं तर कंठा द्या ह्मणतें ना? तुह्मी एवढे मोठे गृहस्थ मला फसविणार कीं काय?

**हेम० शृं०**--चल निघ इंखिणी एथून. धर्म्या, चल आपण जाऊं.

**धर्म्या शृं०**--बाई साहेब, जातों बरें का? आपले पति पिशाचराज यांना माझा नमस्कार सांगा.

[ हेमकांत आणि धर्म्या शृंगारपुरकर जातात. ]

**वेश्या**--या हेमकांताला वेड लागलें आहे, यांत संशय नाहीं. नाहीं तर तो इतका हलकटपणा कधीं करायचा नाहीं. त्याच्यापाशीं चाळीस होन किमतीची माझी आंगठी आहे, आणि त्याबद्दल त्यानें मला कंठा देण्याचें कबूल केलें आहे. आतां तो मला आंगठीही नाहीं ह्मणतो आणि कंठाही नाहीं ह्मणतो! मला खचीत वाटतें, तो वेडा झाला. एक तर, आतां हा वेडेपणा केला, आणि मघाशीं एक त्यानें मला वेडेपणाची गोष्ट सांगितली. ह्मणाला—बायकोनें दार लावून घेतलें आणि घरांत येऊं दिलें नाहीं. कदाचित् असेंही असेल कीं, हें याला वेड लागलें हें पाहून तिनें मुद्दाम दार लावून घेतलें असेल. आतां आपण त्याच्या घरीं जावें आणि त्याच्या बायकोला सांगावें, त्याला वेड लागून तो माझ्या घरांत शिरला आणि जुलमानें माझा आंगठी

घेऊन पळून गेला. ही युक्ति केलीच पाहिजे. कारण चाळीस होन ह्मणजे लहानसान रकम नाहीं. ( जाते )

प्रवेश चवथा.

[ हेमकांत सारंगपुरकर, आणि जमादार येतात. ]

**हेम० सा०**—तुह्मी मनांत भय नका बाळगूं. मी पळून नाहीं जायाचा. ज्या रकमेकरितां मला पकडलें आहे, ती रकम देईन आणि मग तुह्मांला विचारून जाईन. आमच्या कुटुंबाची तब्येत आज जरा तऱ्हेवाईक झाली आहे, आणि या सारंगपुरांत मला कैद केलें, हें एकाएकीं तिला खरें वाटणार नाहीं. पहा, याचा तिला मोठा चमत्कार वाटेल—हा पहा, धर्म्या आला ( धर्म्या सारंगपुरकर चाबूक घेऊन येतो. ) त्यानें द्रव्य आणलें असेल. कांरे, मीं ज्याकरितां तुला पाठविलें तें आणलेंस का ?

**धर्म्या सा०**—होय, हें पहा आणलें; सगळ्यांचा समाचार घेण्यासारखें आहे.

**हेम० सा०**—अरे पैसे कोठें आहेत ?

**धर्म्या सा०**—पैसे दिले चाबुकवाल्याला.

**हेम० सा०**—गाढवा, पांचशें होन चाबकाला पडले काय?

**धर्म्या सा०**—पांचशें होन कुठले ?एका चाबकानें पांचशें वळ मात्र उठतील.

**हेम० सा०**—अरे, तर मीं तुला घरीं कशासाठीं पाठविलें?

**धर्म्या सा०**—मला चाबकासाठीं पाठविलें, आणि हा मी चाबूक घेऊन आलों आहें.

**हेम० सा०**—ये गाढवा इकडे, त्याचसाठीं तुझा चांगला समाचार घेतों. ( त्याला चाबकानें मारतो. )

जमा०—अहो महाराज, शांत व्हा, शांत व्हा.

धर्म्या सा०—मीच आपला शांत होतों.

जमा०—अरे वेड्या, आतां आपलें तोंड आटोपशील तर बरें.

धर्म्या सा०—त्यांना आधीं आपले हात आटप्रायाला सांगा.

हेम० सा०—लुच्चा! मूर्खा! रांडलेका! गाढवा!

धर्म्या सा०—महाराज, खरोखरी गाढव असतों तर बरें होतें. मग तुमचे गुद्दे नसते लागले.

हेम० सा०—खरोखरीच तूं गाढव आहेस. तुला जोडेच पाहिजेत.

धर्म्या सा०—मी गाढव खराच. हे पहा माझे कान लांब आहेत. मीं जन्मापासून यांची इमानानें नोकरी केली; आणि माझें बक्षीस काय ह्मणाल तर मार, दुसरें कांहीं नाहीं. मला जेव्हां थंडी होते तेव्हां हे गुद्दे मारून मला गरम करितात; आणि जेव्हां मी गरम असतों, तेव्हां लाथाबुक्यांनीं नरम करितात. मला झोंप लागली ह्मणजे उठायासाठीं मार; घरांतून बाहेर जातांना मार; तसेंच घरीं आलें ह्मणजे पहिल्यानें सलामीचा मार. या लाथाबुक्यांचें ओझें माझ्या पाठीवर आणि खांद्यावर रगड भरलें आहे. मीं दुसऱ्याला उदार होऊन किती जरी दिलें, तरी यांतलें कांहीं कमी होत नाहीं; माझा सांठा आहे तो आहेच.

[ तारामती, भानुमती, वेश्या, पंचाक्षरी व इतर लोक येतात. ]

हेम० सा०—चल निघ येथून, ती पहा तुझी यजमानीण आली.

धर्म्या सा०—बाईसाहेब, संभाळा बरें का! चाबूक येईल.

**हेम० सा०**—गाढवा, अजून बोलतोस? (त्याला मारतो.)

**वेश्या**—पहा आतां कसें! तुमचा नवरा वेडा झाला आहे कीं नाहीं खरोखरी?

**तारा**—खरेंच, ह्या दांडगेपणाचा दुसरा काय अर्थ? वैद्यबावा, तुह्मांला मंत्रांचें चांगलें ज्ञान आहे, एकदां शुद्धीवर आणा, तुह्मी जें मागाल तें मी देईन.

**भानु०**—ते पहा कसे डोळे लाल दिसतात, आणि वटारून पहातात.

**वेश्या**—आणि कसे थरथर कांपतात. खरोखरी वेड लागलें बाई.

**वैद्य**—(हेमकांतास) तुमचा हात इकडे करा बरें, मी नाडी पहातों.

**हेम० सा०**—हा माझा हात आधीं तुमची मुखश्री पहातो, घ्या. (त्याच्या तोंडांत मारतो.)

**वैद्य**—हे पिशाचा, या मनुष्याच्या शरीरांत तुझा संचार झाला आहे. पहा, मी मोठा पंचाक्षरी आहें. तूं आल्या वाटेनें निघून जा; नाहीं तर तुला मी आपल्या मंत्रसामर्थ्यानें गाडून टाकतों—छूः छूः

**हेम० सा०**—गप्प बैस थेरड्या! मूर्खा, गाढवा! मला नाहीं भुताचा संचार झाला! मी चांगला शुद्धीवर आहें!

**तारा०**—फुटलें माझें नशीब! काय हो प्राणनाथ तुमची अवस्था झाली आहे! माझें करंटीचें काय हो दैव हें! परमेश्वरा, कायरे मी मागल्या जन्मीं पातक केलें ह्मणून यांनीं असें वेड व्हावें?

**हेम० सा०**—हा रांडे! हेंच का तुझें गिऱ्हाईक घरीं जेवायाला आलें होतें तें? मला बाहेर ठेवून याच काळ-

तोंड्याला जेवायाला घातलेंस? मला घरीं येऊं दिलें नाहीं-सना रांडे? आणि आतां एथें येऊन रडतेस?

**तारा०**—प्राणनाथ, ईश्वर साक्ष आहे, तुह्मीच किहो घरीं जेवलां! ही इतकी लोकांत फटफजीती आणि भर रस्त्यांत गैरअब्रू होत आहे, त्यापेक्षां तुह्मी घरींच राहिलां असतां तर किती बरें चांगलें झालें असतें?

**हेम० सा०**—घरीं जेवलों? कां रे धम्र्या, आपण घरीं जेवलों?

**धम्र्या० सा०**—नाहीं महाराज, खरोखर तुह्मी घरीं जेवलां नाहीं.

**हेम० सा०**—दरवाजाला आंतून कडी घालून घेऊन, घरांत येऊं नका, असें नाहीं आह्मांला सांगितलें?

**धम्र्या सा०**—असेंच झालें, असेंच त्यांनीं सांगितलें खरें.

**हेम० सा०**—घरांतून भजीनें मला शिव्या दिल्या, मला भलतें भलतें लावून बोलली, माझी निर्भर्त्सना केली. नाहीं कायरे?

**धम्र्या सा०**—खरेंच तिनें असें केलें. त्या रांडेनें तुमची फार फजिती केली.

**हेम० सा०**—आणि मग मी रागानें नाहीं निघून गेलों?

**धम्र्या सा०**—खरोखरोच तुह्मांला राग आला आणि तुह्मी निघून गेलां. राग आला होता कीं नाहीं तें माझ्या पाठीला विचारावें. सगळा राग माझ्यावर निघाला. ह्मण-तात नाहीं वड्याचें तेल वांग्यावर.

**तारा०**—वैद्यबावा, ते जसें ह्मणतील त्याला होस हो ह्मणण्यानें कांहीं बरें होईल का?

**वैद्य**—त्या बेट्याला कांहीं शरमच नाहीं. त्यांची तब्बेत

काय आहे तें समजून तो आपला त्यांच्यासारखाच बोलतो आहे. ते जर ह्मणतील—सूर्य पश्चिमेकडे उगवतो, तर तोही आपला "होय महाराज" असें ह्मणेल.

**हेम० सा०**—मला कैद करण्याकरितां तूं त्या सोनारड्याला चिथावून दिलेंस, नाहीं ?

**तारा०**—अहो नाहीं हो! काय सांगावें! हा धर्म्या धांवत धांवत आला होता, त्याच्या बरोबर तुमची सुटका व्हावी ह्मणून मीं होनांची थैली देखील पाठविली.

**धर्म्या सा०**—माझ्या बरोबर थैली पाठविली! नाहीं हो धनी साहेब, एक कवडीदेखील मला दिली नाहीं.

**हेम० सा०**—लबाडा, तूं होनांची थैली आणायाला घरीं नव्हतास का गेलास?

**तारा०**—तुकती घटकाच झाली, तो मजकडे धांवत आला आणि मीं त्याला लागलीच थैली दिली.

**भानु०**—मी साक्ष आहे. माझ्यादेखत तारामतीनें थैली याच्याजवळ दिली.

**धर्म्या सा०**—ईश्वर साक्ष आहे, आणि चाबुकवाला साक्ष आहे. मला चाबुक आणायाला पाठविलें होतें, दुसरे मी कोठें गेलों नाहीं.

**वैद्य**—बाईसाहेब, यजमानाला व चाकराला दोघांनाही भूतसंचार झाला आहे. त्यांचीं तोंडें पहा कशीं फिकीं दिसतात व डोळे पहा कसे तारवटलेले आहेत? त्यांना बांधून अंधारकोठडींत कोंडून ठेविलें पाहिजे.

**हेम० सा०**—(तारामतीस) बोल आधीं, तूं आज मला घरांत कां येऊं दिलें नाहींस? आणि (धर्म्यास) अरे धर्म्या, तूं थैली दिली नाहीं ह्मणून नाकबूल कां रे जातोस?

**तारा॰**—प्राणनाथ, अहो मीं असें नाहीं हो केलें! कसें बरें तुह्मांला मी घरांत येऊं नका ह्मणेन?

**धर्म्या सा॰**—धनीसाहेब, मला थैली नाहीं हो मिळाली. हें मात्र खरें, आज दार बंद करून आपणांला घरांत येऊं दिलें नाहीं.

**तारा॰**—ठका, लबाडा, तूं दोन्ही गोष्टी खोट्या बोलतोस!

**हेम॰ सा॰**—रांडे, लबाडे, तूं सगळें लबाड बोलतेस! तूं लुच्चे आणि सोदे लोकांशीं कट केला आहेस, आणि माझी फजिती मांडली आहेस. पण पहा, याच नखांनीं तुझे डोळे फोडून तुला आंधळें करून टाकतों. ह्याच डोळ्यांना माझी थट्टा, फजिती पहावीशी वाटते नव्हे?

**तारा॰**—अहो वैद्यबावा, यांना बांधा अगोदर, मजजवळ येऊं देऊं नका. (पंचाक्षरी आणि त्याचे लोक हे हेमकांत व धर्म्या यांना बांधूं लागतात.)

**वैद्य**—आणखी अधीक लोक पाहिजेत. पिशाच मोठें जबरदस्त आहे.

**भानु॰**—कायरे देवा! काय बिचाऱ्यांची दशा ही! किती फिक्कट दिसतात हे!

**हेम॰ सा॰**—काय, मला तुह्मी ठार मारणार? जमादार, मी तुमच्या ताब्यांतला कैदी आहें; आणि हे मला सोडविताहेत. पहा बरें, तुह्मी यांना व्यवहाराविरुद्ध वागूं देऊं नका.

**जमा॰**—अहो महाराज, सोडा त्यांना. ते माझ्या ताब्यांत आहेत. मी नाहीं त्यांना तुमच्या स्वाधीन करणार.

**वैद्य**—अरे, यालाही बांधा. हा देखील वेडा दिसतो.

**तारा॰**—कां जमादारबावा, तुह्मांला यांत कांहीं आनंद वाटतो काय? ते अगदीं वेडे झाले आहेत; आणि त्यांनीं

आपल्याला आणि दुसऱ्यांना दुखापत करावी हें तुह्मांला बरें वाटतें का ?

**जमा०**—ते माझ्या ताब्यांत कैदी आहेत. त्यांला मी जर सोडलें तर त्यांचें कर्ज माझ्या डोक्यावर बसेल.

**तारा०**—मी आतां सगळें कर्ज देऊन टाकतें. चला मजबरोबर त्या सावकाराकडे. कसचें कर्ज आहे तें मला समजलें ह्मणजे मी देईन. वैद्यबावा, यांना संभाळून नीट घरीं घेऊन जा. काय आजचा दिवस हा ? कोणाचें तोंड पाहिलें होतें काय जाणें !

**हेम० सा०**—काय दुष्ट रांड आहे पहा !

**धर्म्या सा०**—महाराज, तुमच्याकरितां मला बांधतात !

**हेम० सा०**—चल निघ लुच्चा, माझ्याशीं नको बोलूं. काय ह्मणून तूं मला खवळवतोस ?

**धर्म्या सा०**—खवळूनखवळून एकदां खरे तरी वेडे व्हा. उगीच फुकट कां बांधून घ्यायाचें ? वेडे व्हा—ओरडा—ओरडा ! !

**भानु०**—अरेरे ! काय बिचाऱ्यांची दशा ? काय बडबड करितात पहा ! ईश्वरा, त्यांना लवकर बरें कर.

**तारा०**—हं, चला त्यांना घेऊन जा. ताई भानुमती, तूं चल मजबरोबर. ( पंचाक्षरी, त्याचे लोक, हेमकांत आणि धर्म्या सारंगपूरकर हे जातात. ) मला सांगा, कोणाच्या फिर्यादीवरून यांना कैद केलें आहे ?

**जमा०**—एक जगजीवन ह्मणून सोनार आहे. तो तुमच्या आहे ओळखीचा ?

**तारा०**—हो आहे. देणें किती आहे ?

**जमा०**—दोनशें होन.

**तारा०**--कशाबद्दल कर्ज आहे ?

**जमा०**--तुमच्या यजमानांनीं एक कंठ त्याच्यापासून घेतला आहे त्याचें हें कर्ज.

**तारा०**--त्यांनीं एक माझ्याकरितां कंठ करायाला सांगितला होता खरा, पण तो मिळाला नाहीं.

**वेश्या**—तुमचे यजमान जेव्हां माझ्या घरीं आले, तेंव्हां त्यांची अगदीं रागीट मुद्रा होती. आतां त्यांच्या बोटांत मीं जी आंगठी पाहिली, ती तेंव्हां ते घेऊन गेले. मग लागलेच मला भेटले, तेव्हां तो कंठ त्यांच्यापाशीं होता.

**तारा०**—असेल; पण मीं नाहीं कधीं पाहिला. चला त्या सोनाराकडे, मला ही सगळी हकीकत कळली पाहिजे.

[ हेमकांत शृंगारपुरकर आणि धर्म्या शृंगारपुरकर हातांत तरवारी घेऊन येतात. ]

**भानु०**—अग बाई ! आतां काय करूं, ते पुनः सुटले !

**तारा०**--आणि नागव्या तरवारी घेऊन आले ! चला, आणखी पुष्कळ लोक बोलावून आणून त्यांना बांधा तरी !

[ जमादार, तारामती, आणि भानुमती जातात. ]

**हेम० शृं०**--हो हो, हीं भुतें तरवारीला भितात तर मग !

**धर्म्या शृं०**--तुह्मांला जी ह्मणाली कीं, मी तुमची बायको, ती पाहिलीतना कशी पळून गेली ती ?

**हेम० शृं०**--चल आपण विहाराकडे जाऊं आणि आपलें सगळ सामान आणूं. आपण येथून एकदां आलों तसे धड जिवानिशीं गलबतावर चढलों ह्मणजे मिळविली.

**धर्म्या शृं०**—महाराज, एक रात्र रहाना कां येथें ? ते आपल्याला खचित कांहीं उपद्रव करणार नाहींत. पाहिलेंतना एथले लोक आपल्याशीं कसे गोड बोलतात, आणि

होनांच्या थैली देतात ते? मला वाटतें, हे लोक इतके सात्विक आणि गरीब आहेत कीं, एथेंच राहून या भुतांच्या मेळ्यांत मिसळावें. तेवढी ती काळी ढुस्स लोध मला नवरा ह्मणून पाठीस नसती लागली, तर एथल्यासारखें सुख नाहीं.

हेम० शृं०—मला कोणी सगळें गांव बक्षिस दिलें, तरी मी एथें आजच्या रात्रीं राहायाचा नाहीं. चल तर मग, आपण आपलें सामान गलबतावर नेऊं. (जातात.)

## चवथा अंक समाप्त.

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

[ व्यापारी आणि जगजीवन येतात. ]

**जग०**—तुमचा खोळंबा माझ्यामुळें उगीच झाला. मला फार वाईट वाटतें. पण काय करूं, मी शपथ वाहून सांगतों कीं, मीं त्याला कंठा दिला; आणि तो नाहीं ह्मणतो हें अगदीं खोटें.

**व्यापारी**—एथें या शहरांतील लोकांत त्याची योग्यता काय समजतात ?

**जग०**—त्याची योग्यता मोठी आहे, आणि त्याचें वजनही लोकांमध्यें मोठें आहे. त्याची पत मोठी, आणि तो सर्वांस प्रिय आहे. या एवढ्या शहरांत त्याच्यापेक्षां अधिक योग्यतेचा मनुष्य नाहीं. माझ्या घरांत जेवढी जिनगी आहे, तेवढी सगळी त्याच्या एका शब्दानें मिळेल, एवढी त्याची प्रतिष्ठा आहे.

**व्यापारी**—हळू हळू ! मला वाटतें तोच इकडे येतो आहे.

[ हेमकांत शृंगारपुरकर आणि धर्म्या शृंगारपुरकर येतात. ]

**जग०**—हो तोच आहे ! आणि तो पहा कंठा त्याच्या गळ्यांत आहे ! आतां किहो त्यानें शपथ वाहिली कंठा नाहीं ह्मणून ! काय मूर्खपणा ! अहो, माझ्याजवळच असा बरें, मी त्याच्याशीं बोलतों. अहो हेमकांत महाराज, मला फार चमत्कार वाटतो, तुह्मी माझी इतकी फजिती करावी आणि मला इतका त्रास द्यावा, आणि त्यांत तुमचीही अब्रू गेली नाहीं असें नाहीं. मीं कंठा दिला नाहीं ह्मणून किती

शपथा वाहिल्यात, आणि इतकें करून उघडपणानें कंठा गळ्यांत घालून हिंडतां! आरोप, फजिती व कैद हें इतकें सगळें होऊन या बिचाऱ्या गृहस्थाचा उगीच खोळंबा केलात. आपल्ला हा कज्जा झाला नसता तर हा गृहस्थ गल्बतांत बसून एव्हांना गेला देखील असता. हा कंठा मीं तुह्मांला दिला. अजून तुह्मी नाकबूल जातां?

**हेम० शृं०**—होय, तुह्मी मला कंठा दिला. मीं कधीं नाहीं ह्मटलें?

**व्यापारी**—हो हो, तुह्मी नाहीं ह्मणालां, आणि खोटी शपथ देखील वाहिलीत.

**हेम० शृं०**—मी नाहीं ह्मणालों, आणि शपथ वाहिली! कोणीं ऐकलें?

**व्यापारी**—या कानांनीं ऐकलें-तूं फार लुच्चा दिसतोस. संभावित लोकांनीं तुला जोड्यापाशीं देखील उभें करूं नये.

**हेम० शृं०**—तूं मला असें वाईट बोलतोस! तूंच लुच्चा आहेस. तुझ्यामध्यें ताकद असली तर ये पुढें उभा रहा, तुला दाखवितों मी कसा आहें तो.

**व्यापारी**—हो हो, हा बघ मी उभा रहातों, आणि तुला एकदा नाहीं, पन्नासदा लुच्चा ह्मणतों.

(ते लढतात.)

[तारामती, भानुमती, वेश्या, आणि इतर लोक येतात.]

**तारा०**—अहो थांबा थांबा, त्यांना इजा नका हो करूं! तुह्मांला देवाची शपथ आहे! त्यांना वेड लागलें आहे. कोणी तरी त्यांच्याजवळ जाऊन तेवढी तरवार घ्या त्यांच्या हातां-तून. त्या धर्म्यालाही बांधा; आणि जा घेऊन आमच्या घरीं.

**धर्म्या शृं०**—धनी साहेब, बघतां काय? पळा-चला

या घरांत शिरा. हा कांहीं मत्र आहे वाटतें. आंत चला, नाहीं तर प्राण जातो. ( मठांत शिरतात. )

[ गोसावीण येते. ]

**गो०**—लोक हो, शांत व्हा. काय ह्मणून तुह्मी एथें जमलां आहां ?

**तारा०**—माझ्या प्राणनाथांना वेड लागलें आहे, त्या बिचाऱ्यांना घरीं घेऊन जाण्याकरितां आह्मी आलों आहों. आह्मांला आंत येऊं द्या. ह्मणजे त्यांना घट्ट बांधून घरीं घेऊन जाऊं.

**जग०**—मला वाटलेंच, तो शुद्धीवर नाहीं ह्मणून.

**व्या०**—अरेरे ! मी उगीच त्याच्याशीं लढूं लागलों ! मला तो वेडा आहे तें नव्हतें ठाऊक.

**गो०**—त्याला वेड लागून किती दिवस झाले ?

**तारा०**—या आठ दिवसांत तोंड सुमुखलेलें, नेहमीं दुःखी. कष्टी, [illegible] असे दिसूं लागले, आणि पूर्वीची चर्या अगदीं पालटली. पण इतका [illegible] अशी वेड्यासारखी दशा ही आजच आली.

**गो०**—समुद्रांत कांहीं गलबत बुडून त्यांची स[illegible] गेली आहे काय ? किंवा कोणी अगदीं जिवलग मित्र मरण पावला आहे ? किंवा त्यांचें मन एखाद्या परस्त्रीवर तर नाहीं ना बसलें ? तरुण लोक जे डोळ्यांचें सुख घेऊं ह्मणतात त्यांच्यामध्यें हें पातक फार आहे. यांतलें कोणतें बरें दुःख त्यांला झालें आहे ?

**तारा०**—कोणतेंही दुःख नाहीं. शेवटीं आपण ह्मणालां तें असलें तर कोण जाणे. कदाचित एखाद्या परस्त्रीच्या मोहपाशांत सांपडले असले तर मला ठाऊक नाहीं.

गो०—असें असलें तर तूं त्यांना रागें भरायाचें होतेंस.

तारा०—अहो, मी तर रागें भरलें.

गो०—पण तुझें बोलणें खरमरीत नसेल.

तारा०—बायकांनीं खरमरीत बोलावें, त्यांत कांहीं मीं कमी नाहीं केलें.

गो०—पण तूं त्यांना एकांतीं बोलली असशील.

तारा०—नाहीं, लोकांच्या देखत देखील बोलायाला मी सोडलें नाहीं.

गो०—पण आपली उगीच थोडें थोडें मधून मधून बोलली असशील.

तारा०—नाहीं हो, अगदीं एकसारखी बोलत होतें. आमचें दुसरें कांहीं भाषणच व्हायाचें नाहीं. बिछान्यावर निजलें असलें ह्मणजे तेंच बोलावें. जेवायाच्या वेळेस तेंच, एकांतांत असलों ह्मणजे बोलायाचें कायतें तें. मंडळींत देखील मीं ती गोष्ट काढावी. नेहमीं ह्मणावें, हें तुमचें करणें नीच आहे आणि वाईट आहे.

गो०—याच कारणानें तर मग त्याला वेड लागलें बरें. एकद्या बायकोच्या अंगांत मत्सराचें वारें शिरलें ह्मणजे मग विचारूं नका. तिच्या पेक्षां पिसाळलेलें कुत्रें बरें, त्याचें विष इतकें नाहीं बाधत. एकून तुझ्या बडबडण्यानें आणि शिव्यांनीं त्याला झोंप देखील नीट येत नव्हती. एवढ्याचमुळें त्याच्या डोक्यांत वेड शिरलें. तूं ह्मणतेस, जेवायाच्या वेळेस देखील त्यांना तूं बोलत होत.. तुझ्या शिव्या आपल्या जसें कांहीं तोंडीं लावणेंच! जेवायाच्या वेळेस मनुष्याचें मन स्वस्थ नसलें तर त्याला कांहीं अन्न पचत नाहीं; आणि त्याच्यापासून मग ज्वर उत्पन्न होतो.

वास्तविक ज्वर ह्मणजे काय आहे–ती एक वेडेपणाची लहरच आहे. आपण पहात नाहीं, मनुष्यें कशीं तापांत बडबडतात ती? तूं ह्मणतेस, त्यांच्या खेळायाच्या आणि करमणुकेच्या वेळेस देखील तूं त्यांना टोंचून बोलत होतीस. करमणूक बंद झाली ह्मणजे मग दुसरें काय होणार?–सुस्ती आणि मनाला खेद. जीवाला नेहमीं असमाधान, जीवाचा कंटाळा आणि त्यापासून मग नानाप्रकारचे रोग उत्पन्न व्हायाचे; आणि पुढें जीवाची भीति. जेवायाच्या वेळेस, करमणुकेच्या वेळेस, आणि झोंपेच्या वेळेस त्रास झाला, तर मनुष्यालाच काय, पण एकाद्या जनावराला देखील वेड लागेल. यावरून एवढें झालें कीं, तुझ्या मत्सरानें नवऱ्याला वेड लागलें.

भा॰—[illegible] कधीं त्यांना असें खरमरीत बोलली नाहीं. एकाद्या वेळेस कुठें बोलली तर सौम्यपणानें आणि गरीबीनें. आणि तें तरी केव्हां? जेव्हां नवरा फारच दांडगेपणा करून वेड्यासारखें करी तेव्हां. ताई, तूं कां त्यांचें बोलणें अगदीं निमूटपणें ऐकून स्वस्थ बसलीस?

तारा॰—अग करूं काय, माझ्याच तोंडानें मेली त्यांनीं माझी फजिती केली. लोकहो, तुह्मी चला आंत, आणि धरा त्यांना.

गो॰—मी आपल्या घरांत कोणाला नाहीं येऊं द्यायची!

तारा॰—तुह्मी आपल्या चाकरांना सांगा तर मग त्यांना बाहेर आणायाला.

गो॰—तेंही नाहीं व्हायाचें. हा मठ आहे, आणि एथें आपण सुरक्षित राहूं असें समजून तो आंत शिरला आहे. याकरितां मी तुह्मांला त्यास हात नाहीं लावूं द्यायाची. मी

आधीं त्याचें वेड घालवून टाकीन; आणि जर हातच टेकावे लागले तर मग पाहीन.

**तारा०**—मी आपल्या प्राणनाथांजवळ राहीन, त्यांची सेवा करीन, आणि त्यांना बरें करीन. हें माझें काम आहे. मी हें दुसऱ्याला कधीं नाहीं करूं द्यायाची. या कामाला मला दुसरें कोणी नको. याकरितां मी त्यांना घरीं घेऊन जातें.

**गो०**—तूं इतकी उतावळी होऊं नको. जेवढे उपाय ठाऊक आहेत ते सर्व केल्याशिवाय मी त्याला एथून जाऊं द्यायाची नाहीं. त्याला चूर्ण देईन, मात्रा देईन, मंत्र घालीन, देवाची आराधना करीन. अशा रीतीनें त्याला शुद्धीवर आणण्याकरितां हरप्रयत्न करीन. असलें परोपकाराचें काम करावें हा आह्मां लोकांचा धर्म आहे; आणि असेंच करीन ह्मणून मीं शपथ घेतली आहे. तर तूं एथून निघून जा, आणि त्याला राहूं दे एथें.

**तारा०**—त्यांना सोडून मी एथून कधीं जायाची नाहीं. नवरा आणि बायको यांच्यामध्यें तुटातूट करावी हें तुमच्या सारख्या परोपकारी मनुष्यांस शोभत नाहीं.

**गो०**—जास्ती बोलण्याचें काम नाहीं. तुझ्या स्वाधीन मी त्याला नाहीं करणार. ( निघून जाते. )

**भानु०**—हा मोठा जुलूम झाला बाई! आतां राजाकडे फिर्याद केली पाहिजे.

**तारा०**—चला जाऊं. मी राजाच्या पायापाशीं साष्टांग नमस्कार घालीन आणि रडेन; त्यांची प्रार्थना करीन आणि त्यांना एथें घेऊन येईन. नाहीं आले तर मी तशीच पडून राहीन उठायाचीच नाहीं. महाराजांची स्वारी आली ह्मणजे ही गोसावीण आपोआप प्राणनाथाला माझ्या स्वाधीन करील.

**ट्या॰**—आतां पांच वाजायाची वेळ झाली आहे. मला वाटतें, महाराज आतां इकडेच, मठाच्या पाठीमागें तुरुंग आहे त्याच्याजवळ वध करण्याची जागा आहे, तेथें येतील.

**जग॰**—तेथें कशाकरितां ?

**ट्या॰**—एक शृंगारपुरचा वृद्ध व्यापारी दुदैवानें या बंदरीं आला आहे; आणि त्या शहरच्या लोकांविषयीं तर एथले नियम कसे कडक आहेत हें तुह्मांला माहीत आहेच. त्याचा प्रसिद्धपणें वध करायाचा आहे; तो पहायाला स्वारी आतां येईल.

**जग॰**—अरे, ते पहा आलेच. चला आपण वध करायाच्या ठिकाणीं पहायाला जाऊं.

**भानु॰**—( तारामतीस ) स्वारी मठाच्या पलीकडे जाण्याच्या अगोदरच तूं त्यांना नमस्कार घाल.

[ राजाची स्वारी, धनपाल ( बोडका ), चांडाल आणि दुसरे राजसेवक येतात. ]

**राजा॰**—आणखी एकदां मोठ्यानें दौंडी द्या. इतकी रकम द्यायाला अजून जरी कोणी एकादा मित्र उभा राहील तर त्याला नाहीं मारायाचें, इतकी आह्मी अजून दया करूं.

**तारा॰**—दयानिधे महाराज, माझी या एथल्या गोंसाविणींवर फिर्याद आहे.

**राजा॰**—काय गोंसावीण बाईवर ? ती गोंसावीण मोठी पोक्त आणि पवित्र आहे. तिच्या हातून कधीं अपराध नाहीं व्हायाचा.

**तारा॰**—महाराज, या दासीची प्रार्थना आहे ती ऐकून घ्यावी. महाराज, आपल्या आज्ञेनें माझ्या पित्यानें हेमकांताशीं माझें लग्न लाविलें, आणि माझें सर्व स्त्रीधन त्याच्या

स्वाधीन केलें. आज त्या माझ्या प्राणनाथांना एकदम मोठें चमत्कारिक तऱ्हेनें वेड लागलें. इतकें झालें कीं, जीवावर उदार होऊन ते रस्त्यांतून धांवूं लागले. आणि काय चमत्कार सांगावा, घरचा सेवक देखील त्यांच्या सारखा वेडा झाला आणि त्यांच्या बरोबर धावूं लागला ! हे वेडे होऊन शहरांतील लोकांना त्रास देऊं लागले. लोकांच्या घरांत घुसावें, कोणाच्या आंगठ्या घ्याव्या, कोणाचा कंठा घ्यावा, मोतें घ्यावीं, लहर लागेल तें घेऊन जावें,-असा प्रकार झाला. मीं एकदां त्यांना बांधलें आणि घरीं पाठविलें. आणि जिथें जिथें कांहीं वेडेपण केलें होतें तिथें तिथें आपलें तें सगळें सांवरूनसवरून यथास्थित करावें ह्मणून मी फिरत होतें. इतक्यांत काय चमत्कार झाला कीं, कोण लोक त्यांना सहाय झाले कोण जाणें, ते ज्यांच्या ताब्यांत होते त्यांच्या हातांतून सुटले; आणि ते आणि त्यांचा सेवक-दोघेही वेडे-नागव्या तरवारी हातांत घेऊन, मोठे संतापलेले असे आमच्या जवळ आले. नागव्या तरवारी घेऊन आमच्या अंगावर धांवत येताहेत असें आह्मीं जेव्हां पाहिलें, तेव्हां आह्मी पळून गेलों, आणि पुष्कळ लोक घेऊन पुनः त्यांना बांधायाला आलों. मग ते या मठांत पळून गेले, आणि आह्मी त्यांच्या मागोमाग गेलों. आणि ही गोंसावीण आह्मांला आंत जाऊं देत नाहीं, आणि त्यांना घरीं घेऊन जाऊं देत नाहीं. बरें, आपल्या सेवकाबरोबर त्यांना बाहेर पाठवा ह्मणजे आह्मी घेऊन जाऊं, असें ह्मटलें, तर तसेंही करीत नाहीं. दयानिधे, कृपानिधे, महाराज, आज्ञा व्हावी त्यांना बाहेर आणविण्याची, ह्मणजे आह्मी घरीं घेऊन जाऊं.

**गोंसावीण**—राजाधिराज महाराज, पहा या मनुष्या-वर किती जुलूम झाला आहे!

**धर्म्या शृं०**—धनीसाहेब, हीं सगळीं भुतें एथेंच आहेत. ही वेताळमहाराजांची स्वारी वाटतें.

( सर्व त्यांला पहायाला येतात. )

**तारा०**—अग भानुमती, कायग, मला बाई आतां दोन नवरे दिसतात! मी स्वमांत तर नाहींना?

**राजा**—यांतील एकजण दुसऱ्याची केवळ प्रतिमा आहे. आणि तसेच हे चाकर मला वाटतें, यांतल्या एका-नें कांहीं जादू करून दुसऱ्याचें हुबेहुब रूप घेतलें आहे. यांत खरा मनुष्य कोणता आणि पिशाच कोणतें? पाहूं कोण ओळखून काढतो तें.

**धर्म्या सा०**—महाराज, मी धर्म्या; त्याला द्या हांकून.

**धर्म्या शृं०**—महाराज, मी धर्म्या; आणि हा एथल्या भूतमेळ्यांतला कोणीतरी एक आहे.

**हेम० शृं०**—तुह्मी धनपाल नव्हे कांहो? कां कोणी पिशाचानें त्यांचें रूप धारण केलें?

**धर्म्या शृं०**—अहो, माझे मोठे धनीसाहेब! यांच्या मुसक्या कोणी बांधल्या?

**गोंसावीण**—कोणीही बांधल्या असोत, मी त्यांना मुक्त करितें. ते सुटले ह्मणजे माझे पतिच मला पुन्हा मिळाले. वाहवा! काय दिवस हा! अहो धनपाल महाराज, बोला! अहो, ज्यांना इंदुमती ह्मणून एक बायको होती, आणि तिला दोन उत्तम मुलगे आवळे जावळे झाले, ते तुह्मीच का! तेच तुह्मी धनपाल असाल तर या इंदुमतीशीं बोला.

**धनपाल**—जर हें सगळें स्वम नसेल; तर तूं इंदुमती

आहेस यांत संशय नाहीं. खरोखरीच जर तूं इंदुमती आहेस तर सांग सांग लवकर, तुझ्या बरोबर डोलकाठीवर बांधलेला मुलगा वाहत गेला तो कोठें आहे?

गों०—तो, मी, आणि दुसऱ्या जुळ्यापैकीं धर्म्या या सगळ्यांना चौल एथील लोकांनीं उचलून घेतलें. परंतु पुढें कांहीं वेळानें वसई एथील रानटी कोळी, माझा मुलगा आणि धर्म्या यांस त्यांजपासून बलात्कारानें घेऊन गेले; आणि मी चौल येथील लोकांपाशीं राहिलें. त्यांचें पुढें काय झालें तें मला अजूनपर्यंत ठाऊक नव्हतें. मी मात्र अशी गोंसावीण होऊन ईश्वराची सेवा करीत राहिलें.

राजा—हं समजलें! सकाळीं धनपालानें जी गोष्ट सांगितली ती गोष्ट आतां जुळते. हे दोघे अगदीं सारखे दिसतात ते हेमकांत; आणि जे हे दुसरे एकासारखे एक आहेत ते धर्म्ये. इनेंहि धनपालाप्रमाणेंच समुद्रांत तारूं बुडल्याची गोष्ट सांगितली. तेव्हां ही या दोन हेमकांतांची आई, आणि हा बाप. काय ईश्वरी चमत्कार आज सगळ्यांची एकदम एके ठिकाणीं गांठ पडली ही! हेमकांता, तूं पहिल्यानें वसईहून आलास, नाहीं?

हेम० शृं०—नाहीं महाराज, मी नव्हे तो; मी शृंगारपुराहून आलों.

राजा—अरे थांबा, तुह्मी निरनिराळे उभे रहा; मला कोणचा कोण हें ओळखत नाहीं.

हेम० सा०—दयानिधे महाराज, मी वसईहून आलों.

धर्म्या सा०—आणि मी त्यांच्याबरोबर आलों.

राजा—तो नामांकित शूर योद्धा मंथनपुरचा राजा-तुमचा चुलत सासरा-त्यानें तुह्मांस एथें आणलें.

**तारा०**—तर आज माझ्या घरीं तुमच्यांतून कोण जेवलें ?

**हेम० शृं०**—वहिनी, मी जेवलों.

**तारा०**—आणि तुह्मी नव्हे माझे प्राणनाथ ?

**हेम० सा०**—नाहीं, नाहीं ! स्व: दुसऱ्यालाच लागली प्राणनाथ ह्मणायाला !

**हेम० शृं०**—मी देखील नाहीं नाहीं ह्मटलें, पण ती आपला आग्रह सोडीचना. ह्मणे तुह्मीच माझे प्राणनाथ. आणि ही सुंदरी तिची बहीण मला भावोजी ह्मणायाला लागली. ( भानुमतीस ) मी जें तुझ्याशीं बोललों, तें पाहतों आतां खरें होतें कीं नाहीं तें. हें सगळें स्वप्नच असेल तर मग कांहीं बोलवत नाहीं.

**जग०**—हाच तो कंठा तुह्मी माझ्याजवळून घेतला तो.

**हेम० शृं०**—होय हाच. मी कोठें नाहीं ह्मणतों ?

**हेम० सा०**—आणि त्याच्याकरितां तूं मला कैदेंत घातलेंस.

**जग०**—होय घातलें. मी कोठें नाहीं ह्मणतों ?

**तारा०**—मी धर्म्याबरोबर तुमची सुटका होण्यासाठीं होनांची थैली पाठविली. मला वाटतें, ती त्यानें नाहीं तुह्मांला आणून दिली.

**धर्म्या सा०**—माझ्याबरोबर नाहीं पाठविली.

**हेम० शृं०**—ही होनांची थैली मला मिळाली, आणि माझ्या धर्म्यानें ती तुमच्यापासून आणली. हां, आतां समजलों. माझा चाकर यांच्याकडे गेला आणि यांचा मजकडे आला; आणि मला सारंगपुरकर ह्मणून समजले आणि त्याला शृंगारपुरकर समजलें. आणि ह्याच कारणाकरितां हा आज घोटाळा झाला.

**हेम० सा०**—हे होन मी बापास वांचविण्यास देतों.

**राजा**—कांहीं जरूर नाहीं. तुझ्या बापाला जीवदान दिलें आहे.

**वेश्या**—महाराज, ती माझी आंगठी द्या परत.

**हेम० सा०**--ही घे आपली.

**गों०**—महाराज, कृपा करून आमच्या बरोबर मठांत चलावें, आणि आमचा इतिहास सविस्तर ऐकावा. आणि एथें जी सर्व मंडळी जमली आहे त्यांनींही चलावें. आज जो हा इतका घोंटाळा झाला, त्यामुळें सर्वांस त्रास पडला. परंतु हा प्रकार कसा मौजेनें घडला, तें लक्षांत आलें ह्मणजे हे सर्व क्षमा करतीलच. मुलांनो, तुमच्यासाठीं पहिल्यानें नऊ महिने कष्ट भोगले ते तर व्यर्थच गेले; परंतु तुमच्या भेटीनें आज या पंचवीस वर्षांच्या कष्टांचें सार्थक झालें. हे राजा, माझे पति, पुत्र, आणि हे सेवक यांस घेऊन मठामध्यें या, ह्मणजे तेथें आपला आश्चर्यकारक वृत्तांत एकमेकांस कळवूं.

**राजा**—फार उत्तम. चला तुमच्या समागमें चार घटका बसून तुमची कथा श्रवण करूं.

[ राजा, गोंसावीण, धनपाल, वेश्या, व्यापारी, जगज्जीवन, हे जातात. ]

**धर्म्या० शृं०**—महाराज, कसें काय, गलबतावरचें सामान उतरून आणूं का?

**हेम० सा०**—धर्म्या, माझें रे कोठलें सामान गलबतावर चढविलेंस?

**धर्म्या शृं०**—आपलें सामान, महाराज, विहारांत होतें तें.

**हेम० शृं०**—तो मजशीं बोलतो आहे. मी तुझा धनी,

धर्म्या. आतां चल आमच्याबरोबर, सामानाचें मग पाहूं. अगोदर आपल्या भावाला भेट चांगला.

[ हेमकांत सारंगपुरकर, हेमकांत शृंगारपुरकर, भानुमती, आणि तारामती, हीं जातात. ]

ध० शृं०—तुझ्या धन्याच्या घरीं एक लढभारती स्त्री आहे, ती आज जेवायाच्या वेळेस मला आपला नवरा समजून मजजवळ येऊं लागली; ती तर मग आतां माझी वहिनी-बायको नव्हे.

धर्म्या सा०—तूं माझा भाऊच काय! मला वाटतें आतां मला आरसा पहायाला नको. तुला पाहून आतां मी किती छानदार, सुंदर, व देखणा दिसतों आणि असें वाटतें कीं, मला पाहून लोक भुलत असतील. बरें, मठांत गोष्टी चालल्या आहेत त्या ऐकायास चला जाऊं.

धर्म्या शृं०—मी नाहीं आधीं जाणार; तूं वडील आहेस.

धर्म्या सा०—याविषयीं शंका आहे, पाहिलें पाहिजे. हें मग कसें समजेल बरें?

धर्म्या शृं०—कोण वडील आहे हें समजण्यासाठीं आपण सोडत काढूं; तें समजेतोंपर्यंत तूं वडील. हो पुढें.

धर्म्या सा०—ह्मणजे कसें तरी तुझ्या मनांत मला दादा ह्मणायाचें. मी नाहीं दादा ह्मणून घ्यायाचा. मी दादा तर तूं पण दादा. आपली दादांची चांगली जोडी होईल.

धर्म्या शृं०—बरें तर मग—

[ साखी. ]

दादा मी तुज ह्मणेन, तूंही ह्मण गा मजला दादा;
कोण धाकटा कोण वडिल या कशास करिशी वादा? १

एके काळीं आलों आपण आवळे जावळे भाऊ;
हातामध्यें हात घालुनी बरोबरीनें जाऊं. २.

[ गात गात निघून जातात. ]

**पांचवा अंक समाप्त.**



इ० स० १८९२ सालीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध झाले या पुस्तकांसंबंधानें हिंदुस्थान सरकाराकडून जो रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे, त्यांत "भ्रांतिकृत चमत्कार" या पुस्तकाबद्दल रावबहादूर नारायणभाई दांडेकर, वऱ्हाड प्रांताचे डिरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन, यांणीं असें लिहिलें आहेः—

BHRANTIKRITA CHAMATKARA.—This is a translation of Shakespeare's Comedy of Errors. It is written in a popular language, and has been on some occasions acted on the stage with applause.

[ "भ्रांतिकृत चमत्कार"—महाकवि शेक्सपियरकृत कॉमेडी आफ् एरर्स" ह्या प्रसिद्ध इंग्लिश नाटकाचें हें मराठी गद्यात्मक भाषांतर आहे. हें लोकांस आवडे अशा भाषेनें लिहिलेलें असून, कितीएकवेळां रंगभूमीवर ह्याचे प्रयोग करून दाखविले, तेव्हां त्याची फार फार वाहावा झाली आहे. ]